शब्द
रुची
सप्टेंबर २०१३
मूल्य १० रुपये
पृष्ठे २८

# हत्या

## सहृदयतेची, विवेकाची...



# बोस्टन अधिवेशनात ग्रंथालीच्या स्टॉलला मान्यवरांची भेट



डॉ. गजानन सबनीस यांच्या बाल्टिमोर येथील घरी झालेल्या गप्पांत गजानन सबनीस, वसंत वसंत लिमये, निरूपमा प्रधान–सोनाळकर, प्रगती कोळगे आणि संजीव दहिवदकर या ग्रंथालीच्या लेखकमंडळींशी  संवाद साधताना लतिका भानुशाली



ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# शब्द रुची

सप्टेंबर २०१३, वर्ष १
अंक चौथा, मूल्य १० रु.

संपादक : सुदेश हिंगलासपूरकर
कार्यकारी संपादक : अरुण जोशी
मुखपृष्ठ व मांडणी : योगिता मोरे

कार्यालयीन संपर्क
शब्द रुची/पुस्तक वितरण – महेश गोरेगांवकर
granthalisales@gmail.com
कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे
granthaliruchee@gmail.com
जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप
granthaliad@gmail.com

केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.
वार्षिक वर्गणी १०० रुपये
डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल,
तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी,
जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प),
मुंबई ४०००१६
☎ २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com

अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठ–समान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.

स.न.वि.वि.

संवाद तुटत चाललेल्या या काळात मनाशी संवाद साधण्याचीही वृत्ती उरलेली नाही. तो साधला असता तर, महात्मा फुले यांच्यावर कुऱ्हाड चालवू पाहणारा जसा त्यांच्या शब्दांनी त्यांचा रक्षणकर्ता झाला तसेच, ते दोघे (?) ज्यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकरांवर गोळ्या झाडल्या त्यांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले असते. दुर्दैवाने तसे घडले नाही आणि सहृदय विवेकी व्यक्तीच्या हत्येने जाणीव असलेल्या मनामनाला सुन्न केले. काय मागत होते, मांडत होते डॉ. दाभोलकर? आणि कुणासाठी? जीवघेण्या अंधश्रद्धेने ग्रासलेल्यांना सुसह्य जीवन जगण्याची दृष्टी ते देऊ इच्छित होते. पैसा–प्रसिद्धी असे अशाश्वत ऐश्वर्य त्यांना वैद्यकी करूनही मिळाले असते. मला काही नको, मी समाजासाठी कसा आहे असा 'अवतार' धारण करता आला असता. विविध क्षेत्रांतल्या नामवंतांनी त्यांच्यापुढे बसून आपण धन्य होत त्यांना 'मोठे' केले असते. पण... डॉ. दाभोलकर पडले सहृदयी. विवेकाने वागणारे. निश्चित कृतिकार्यक्रम घेऊन चालणारे. त्यांच्यासोबत जायचे तर विद्या बालन कशी असणार? तिथे असतात विद्या बाळ... आणि त्यांच्यासारखे निरलस कार्यकर्ते. या सातारकरांनी ज्ञानेश्वरी सांगितली असती तरी मर्सिडिजमधून फिरले असते आणि हजारो लोक भोवती असते. मात्र असे होणे नव्हते. त्यांचा अखेरचा प्रवास ज्या बसने मुंबईहून पुण्याला झाला त्या बसमधील शेजाऱ्यालाही कल्पना नसेल की आपण कोणासह प्रवास करतोय. कदाचित दाभोलकरच त्या व्यक्तीशी बोलले असतील. इतक्या साधेपणाने जगत त्यांनी जो ध्यास धरला तो, त्यांच्या हत्येनंतर सर्वदूर उठलेला आक्रोश हा त्यांच्या जनमनातील प्रतिमेचा आविष्कार होता. त्यांच्या संपर्कात आला तो त्यांच्या स्नेहार्द्र वाणीने त्यांचा झाला नाही, त्यांच्या संयत विचारांनी आणि त्यातील तळमळीने भारला नाही असे घडले नसेल.

...पण असे घडले. कारण ते दोघे(?) त्यांच्या मागून आले गोळ्या झाडायला. त्या मारेकऱ्यांच्या आयुष्यातही ती सकाळ अभद्रच होती. त्यांना हे भान नव्हते की डॉ. दाभोलकर असे संपवता येणार नाहीत. ते देहाने घालवले येशूसारखे, महात्मा गांधींसारखे, कदाचित तुकारामांसारखे, पण ते राहिले आहेत, कायम राहणार आहेत.

अर्थात, ती सकाळ व्हायला नको होती, ही सलही त्यासोबत राहणार आहे.

**– अरुण जोशी**

पुढील अंक ऑक्टोबर–नोव्हेंबर दिवाळी विशेषांक. तो ऑक्टोबर अखेरीस प्रसिद्ध होईल.

# नरेंद्र, या पोकळीचे काय करायचे?...

## अरुण खोरे

मंगळवार, २० ऑगस्टच्या सकाळी मी मुंबईला निघण्याच्या गडबडीत असतानाच युक्रांदच्या एका मित्राचा एसएमएस आला आणि समजले की नरेंद्र खूप दूर निघून गेला आहे. क्षणभर विश्वास बसत नव्हता, पण माध्यमांनी शंका दूर केली. सतत चैतन्याने खळाळणारा एक निर्झर एकदम थांबावा, तसा नरेंद्रचा जीवनप्रवाह समाजकंटकांनी थांबवला होता... पुण्यासारख्या शहरात, मध्यवस्तीत अशी घटना घडते, जेथून अक्षरशः अर्ध्या-एक फर्लांगावरच दोन पोलीस चौक्या (शनिवारपेठ आणि बालगंधर्व) आहेत. अंधश्रद्धा निर्मूलनाचे तो जे काम करीत होता, त्यामुळेच या दुकानदारीवर फुकट जगणारे अनेक हितसंबंधी गट सतत अस्वस्थ होते. त्यात जरणमारण, जादूटोणा करणारे मांत्रिक व बुवा, शास्त्र म्हणून खोट्या थापा मारणारे पोपटपंची ज्योतिषी, देवऋषी, नरबळीचे समर्थन करणारे अघोरी पंथीय भोंदू साधू, कुप्रथांचा बाजार मांडण्यासाठी धर्माच्या नावाखाली सुरू झालेल्या पशुहत्यांचे दलाल आणि धर्माच्या अर्थाचे सनातनत्व जपण्यासाठी धमक्या व दबावाची भाषा करणारे खोटे धर्मपालक अशा सगळ्या हितसंबंधी गटांचा त्याला विरोधच होता.

अशा हितसंबंधी गटांपैकी असलेल्या एका महाराजाने नरेंद्रला धमकीच दिली होती की, याचे हातपाय तोडून टाका. अशा धमक्यांनी तो घाबरणारा नव्हता, डरणारा नव्हता. सरकारी स्तरावरून किंवा पोलीस यंत्रणेकडून त्याला संरक्षणाबाबत विचारण्यात आले, तरी त्याने त्याला अनुकूलता दर्शविली नाही. 'साधना'च्या कार्यालयात त्याच्या खुर्चीमागे गांधीजींची प्रतिमा आहे. गांधीजींचा अहिंसेचा व सत्याग्रहाचा मार्ग त्याने बुद्धिपूर्वक स्वीकारला होता आणि विवेकी विचारातून तो त्याचा आचरणात उपयोग करत होता. गांधीजींचा साधेपणा, सच्चेपणा, आणि आपल्या मार्गावरची अढळ निष्ठा हे त्याच्या व्यक्तित्वाचे जसे गुण होते, तोच विशेष त्याच्या चळवळीच्या एकूण कामात होता. म्हणूनच त्याच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झाली, ती कशी भरायची हाच खरा प्रश्न आपल्या सर्वांसमोर आहे.

एखादा माणूस आणि त्यातही तुमचा मित्र, शिवाय चळवळ आणि विचारातील सहप्रवासी असा अचानक निघून जातो, तेव्हा आपली स्थिती काय होते? नरेंद्र असा अचानक-अवचित जाणाऱ्यांपैकी नव्हताच! तो ठामपणे उभा राहून आपल्या पुढे चालत जाणारा होता. त्याला अचानक जावे लागले, कारण त्याला ठार करण्यात आले. ते कोणी केले, याचा छडा लागेल तेव्हा लागेल ... पण आपला हा मित्र मात्र आता काळाच्या पडद्याआड गेला आहे, हे वास्तव स्वीकारणे जड असले तरी ते आहेच!

डॉ. नरेंद्र दाभोलकर – वय ६८ आणि एका ध्येयनिष्ठेने समाजाला जागे करणारा चिकाटीचा अवलिया आणि कलंदरही. आम्ही सगळेच त्याला नरेंद्र म्हणून हाक मारायचो. साताऱ्यातले चळवळीमधले लक्ष्मण माने किंवा पार्थ पोळके हे त्याला नरुभाऊ म्हणून संबोधायचे. फोनवर बोलताना 'अरे, मी नरेंद्र दाभोलकर बोलतोय', अशी त्याची सुरुवात असायची. त्याला प्रतिसाद देताना आम्ही सगळेच, 'हं नरेंद्र, बोल...' असे म्हणायचो. बरे, त्याचा फोन हा अजिबात जनरल ख्यालीखुशाली विचारण्यासाठी नसायचा, तो काही कामांसाठी (व्यक्तिगत नव्हे तर सामाजिकच) असायचा. मग पुढचा संवाद सुरू व्हायचा.

साताऱ्यामध्ये आपले शिक्षण व पुढचे जीवन सुरू केलेल्या नरेंद्रच्या कुटुंबीयांचा आणि माझा परिचय हा त्याच्याशी ओळख होण्यापूर्वी झालेला. नरेंद्रचे थोरले बंधू प्रा. देवदत्त दाभोलकर हे पुणे विद्यापीठाचे कुलगुरू होते. कर्वेनगरला आमच्या घराजवळ त्यांचा बंगला होता. माझ्या लग्नानंतर त्यांनी मला सहकुटुंब जेवायला बोलावले होते. दरम्यान आम्हाला मुलगी झाली. त्यामुळे सरांचे निमंत्रण लांबले होते. एका रविवारी दुपारी त्यांच्या घरी तान्ह्या पूर्वाला घेऊन जेवायला गेलो. त्यावेळी सरांच्या नव्वदीतल्या मातोश्रींनी (ताराबाई) पूर्वाला सांभाळले आणि मग आम्ही जेवायला बसलो. दाभोलकर कुटुंबातल्या अतिशय ज्येष्ठ व वंदनीय अशा माऊलीच्या आपुलकीचा आम्हाला आलेला तो वेगळाच प्रत्यय होता. या निमित्ताने या कुटुंबाशी जिव्हाळ्याचे नाते प्रस्थापित झाले.

'सकाळ'मध्ये काम करताना सामाजिक व शैक्षणिक विषयांवरील विविध स्वरूपात लेखन करणारे लेखक व कार्यकर्ते माझ्या सतत संपर्कात येत असायचे. नरेंद्र त्यांपैकीच एक होता. विशेष म्हणजे तो कबड्डीपटू असल्यामुळे त्याचे त्यावरचे एक




**महिला परिषदेत विद्या बाळ, रीमा लागू, प्रमिला दंडवते, अरुण खोरे, शालिनी ओक आदींसह डॉ. नरेंद्र दाभोलकर**

पुस्तकही साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केले होते. ते घेऊनच तो सकाळमध्ये भेटायला आला होता. नंतर विविध सामाजिक विषयांच्या संदर्भात त्याचे लेखन सुरू झाले आणि हे नाते अधिक दृढ झाले.

महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीत दाभोलकर मंडळींचे योगदान हे आवर्जून नोंदवायला हवे. नरेंद्रसह ही एकूण नऊ भावंडे. ६ भाऊ आणि ३ बहिणी. यांचे वडील अच्युत दाभोलकर हे निष्णात वकील होते. कुलगुरू झालेले प्रा. देवदत्त, प्रा. श्रीपाद, प्रा. अंबू, चारुदत्त, दीनानाथ, प्रा. वेणू पळशीकर, डॉ. नरसिंह, डॉ. दत्तप्रसाद आणि प्रा. अमरजा नेरुळकर ही त्याची भावंडे. यातले श्रीपाद दाभोलकर यांचे लेखन, पुरवणीचे संपादक सदा डुम्बरे यांच्या विशेष संपर्कामुळे सकाळमध्ये नियमित येत असे. त्यामुळे त्यांचा परिचय होता. दुसरे दत्तप्रसाद हे वेगळ्या शैलीचे लेखक, ते नवी दिल्ली येथे श्रीराम इन्स्टिट्यूट या विज्ञान संशोधन संस्थेत संचालक म्हणून काम करीत होते. त्यांच्याशी माझा चांगला परिचय मी 'लोकसत्ता'मध्ये काम करताना झाला. इतक्या व्यापक रीतीने एखादे कुटुंब समाजाशी जोडले जाते, याचे मला विशेष अप्रूप वाटते. आपल्याकडच्या अनेकांनी कुटुंबातील हे धागे कसे जोडायचे, याचा धडा शिकण्याची गरज आहे. कारण त्याच्या बळावरच समाजाशी नाते जोडणे शक्य असते आणि ते कसे जोडायचे हाच धडा नरेंद्रच्या जीवनातून आपल्या सर्वांना मिळाला.

महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींना १९७० ते १९८० या काळात विशेष स्थान प्राप्त झाले. दलित पँथरची स्थापना, युवक क्रांती दलाची सामाजिक आंदोलने, लघुनियतकालिक चळवळी, त्याच सुमारास डॉ. बाबा आढाव यांनी सुरू केलेली 'एक गाव, एक पाणवठा' ही समतेसाठीची मोहीम, अंधश्रद्धा निर्मूलनाचे केरळमधले एक झुंजार कार्यकर्ते बी. प्रेमानंद यांच्या महाराष्ट्र दौऱ्यामुळे बदललेले वातावरण व त्यातून अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीसाठी उभे राहणारे कार्यकर्ते, मराठवाडा विद्यापीठ नामांतर आंदोलन, दलित साहित्याच्या चळवळीला आलेला बहर आणि त्याचे उमटणारे पडसाद, विद्यार्थी आंदोलनांचे प्रवाहीपण, असा सगळा हा काळ होता. त्यामुळे समाजासाठी, देशासाठी काही करू पाहणाऱ्या ध्येयवादी तरुणांना अतिशय मोह घालणारा हा कालखंड होता. यातल्या विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व आणि भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे रणशिंग ज्यांच्याकडे होते, ते होते लोकनायक जयप्रकाश नारायण. बिहारमध्ये त्यांचा लढा सुरू होता आणि महाराष्ट्रातून अनेक कार्यकर्ते तिकडे जात होते. याच काळात मुस्लिम प्रबोधनाच्या चळवळीचे वारेही वाहू लागले होते, आणि विचारी लेखक हमीद दलवाई हे त्याचे कर्णधार होते. असा हा सगळा विद्यार्थ्यांना, तरुणांना अस्वस्थ करणारा कालखंड. यावेळी तिशीत असलेल्या पिढीचा प्रतिनिधी होता डॉ. नरेंद्र दाभोलकर.

महाराष्ट्रामध्ये अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीचे काम सुरू झाले, ते नरेंद्र आणि श्याम मानव यांच्या पुढाकाराने. दोन-तीन वर्षांतच या दोन्ही बिनीच्या शिलेदारांचे मतभेद झाले आणि बहुधा मनभेदही. त्यामुळे नरेंद्रने पुन्हा एकदा नव्या उभारणीला सुरुवात केली व स्थापन झाली 'महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती' ही संघटना. विवेकावर, बुद्धिप्रामाण्यावर विश्वास ठेवून, समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर यांच्याशी नाते जोडत हे काम राज्यभर सुरू झाले. महाराष्ट्राच्या स्वातंत्र्योत्तर सामाजिक इतिहासात एखादी सामाजिक संघटना गावोगावी उभी राहते आणि तेथील अनेक तरुण अंधश्रद्धेच्या विरोधात सुरू असलेल्या लढाईतले सैनिक होतात, याचे ही संघटना म्हणजे एक अलौकिक उदाहरण आहे. आज

महाराष्ट्रात या संघटनेच्या सुमारे २०० शाखा अतिशय नेटकेपणाने कार्यरत आहेत. या शाखांना जोडलेले हजारो तरुण विद्यार्थी व शिक्षक हे त्याचे दूत आहेत, याचा प्रत्यय देखील अनेक ठिकाणी आपल्याला येतो. सुमारे दोन वर्षांपूर्वी अंनिसच्या रौप्य-महोत्सवाच्या निमित्ताने काही विषय सांगायला नरेंद्र 'प्रभात'मध्ये आला होता. ही संघटना सुरू करताना जो अदम्य उत्साह त्याच्या बोलण्यात दिसायचा, तोच सत्तरीच्या जवळ आलेल्या त्याच्या व्यक्तिमत्त्वातही मला तेव्हा जाणवला.

प्रश्न विचारण्याची जिज्ञासा आणि विद्यार्थी व तरुणांशी संवाद करण्याची शैली हा नरेंद्रच्या एकूण संज्ञापन प्रक्रियेतला फार महत्त्वाचा बळकट धागा होता. जटा का वाढवायच्या? अंगात कशासाठी येते? नरबळी का द्यायचा? भुते आहेत का आणि ती स्मशानातच का राहतात? देवीचा कोप का होतो ? देवाच्या दारात समानता का नाही? शनिशिंगणापूरला महिलांना नमस्कार करायला चौथऱ्यावर परवानगी का नाही? तेथे चोऱ्या होत नाहीत, हे मिथ्या की खरे? हातातून अंगठी किंवा राख काढण्यामागे कोणती हातचलाखी आहे? असे अनेक प्रश्न त्याने बुवा-साधूमहाराज मंडळींना विचारले आणि त्यांची एकूण अस्वस्थता वाढवली. हीच भूमिका त्याने महाराष्ट्रातील चमत्कार करणारे महाराज आणि भविष्यवाणी करणारे पोपटपंची ज्योतिषी यांच्या विरोधातही घेतली. त्याचा परिणाम साहजिकच काही धमक्या येण्यात झाला. मात्र समाजावरची अढळ निष्ठा व तरुणांवरील विश्वास कायम असल्याने त्याचे धोके त्याला फार गंभीर वाटले नाहीत.

लोकशाहीमध्ये भारताच्या राज्य-घटनेने वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवा, असे सांगितले आहे. हे काम सरकारचे आहे आणि सरकारमार्फत ज्या अनेक यंत्रणा काम करतात, त्यांचे आहे. या सर्वांचा निर्देश करून नरेंद्रने या कामात शाळा, महाविद्यालये व तेथील शिक्षक-प्राध्यापक यांना सहभागी करून घेण्याचे आवाहन सरकारला व संबंधित यंत्रणांना केले होते. त्यासाठी तो यातल्या अनेक सत्ताधाऱ्यांना भेटत होता, त्यांच्याशी संवाद करीत होता. महाराष्ट्रातील लक्षावधी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत अंनिसचे हजारो कार्यकर्ते 'विवेक वाहिनी' आणि 'विवेक जागरा'च्या माध्यमातून पोचले होते. त्यामुळे महाराष्ट्रातील सर्वदूर गावात नरेंद्रचे कार्यकर्ते होते आणि चाहतेही. धर्म आणि देव यांच्या श्रद्धांना धक्का लागेल, असे काहीही न बोलता वंचित, दुर्बल, अज्ञानी समाजवर्ग आणि महिलांच्या एकूण शोषणाविरुद्ध त्याने अंनिसच्या माध्यमातून आपले काम सुरू ठेवले होते. 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती वार्तापत्र' या नावाचे एक नियतकालिकही आम्हा पत्रकारांना नियमितपणे मिळू लागले होते. संपर्क आणि संज्ञापनेच्या सर्व मितींचा वापर तो अतिशय कुशाग्रतेने करत असल्याचे दिसत होते, आणि त्याबद्दल आम्हा अनेक पत्रकार मित्रांना त्याच्या प्रत्येक मोहिमेबाबत कुतूहलही वाटत होते.

सामाजिक चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना किमान काही मानधन द्यावे, ही भूमिका घेऊन सामाजिक कृतज्ञता निधीची स्थापना नरेंद्रच्या नेतृत्वाखाली झाली. डॉ. बाबा आढाव, पु.ल. देशपांडे, डॉ. श्रीराम लागू, निळू फुले आणि जळगावचे डॉ. राम आपटे या सर्वांच्या समर्थ सहकार्याने सामाजिक कृतज्ञता निधीचे काम सुरू झाले. या कामात पैसे गोळा करण्यासाठी 'नरेंद्रने एक उपवास कृतज्ञतेचा' अशी कल्पना मांडून शाळेतल्या विद्यार्थ्यांना त्यात सहभागी करून घेतले. यामुळे एकट्या सातारा शहरातून ४८ हजार रुपये जमा झाले. या निधीसाठी 'लग्नाची बेडी' या नाटकाचे प्रयोग राज्यभर झाले. त्यातून भरीव रक्कम जमा झाली. यामुळे अनेक नामवंत कलावंत नरेंद्रच्या सामाजिक कामात सहभागी झाले आणि त्याचे मित्रही बनले. सदाशिव अमरापूरकर, डॉ. लागू, सुहास जोशी, रीमा लागू ही त्यापैकीच काही ठळक नावे. निळू फुले तर आवर्जून नरेंद्रच्या कार्यक्रमाला यायचे. साताऱ्यातील तीन दिवसांच्या अंनिस संमेलनाला निळुभाऊ आले होते. हे निळुभाऊ आणि साताऱ्याचे नरुभाऊ, अशा गप्पा मग आम्ही काही वेळ तरी ऐकत असू. महाराष्ट्रातील वृत्तपत्रांना व माध्यमांना आपली सामाजिक भूमिका निश्चित करण्यासाठी नरेंद्रने अंनिसमार्फत केलेल्या सामाजिक चळवळींचे योगदान हे फार जाणीवपूर्वक अधोरेखित केले पाहिजे, असे मला वाटते.

पुण्याच्या रमणबाग प्रशालेच्या प्रांगणात अंनिसचे कार्यकर्ते कुमार मंडपे आणि पां.न. निपाणीकर या दोघांनी आपल्या सहकाऱ्यांसह घेतलेल्या बुवाबाजी व हातचलाखी विरोधातील मोहिमेची प्रात्यक्षिके हजारो पुणेकरांनी बघितली. एका चर्चासत्रात काही प्रस्थापित मंडळींनी चर्चेला विरोध केल्यावर त्यांचा प्रतिवाद करून त्यांना शांत करण्याची भूमिका नरेंद्रने बजावली. अंनिसच्या कामाची राज्यव्यापी उभारणी करताना पुण्यात १९९२ साली राष्ट्रीय परिषद घेण्यात आली. नानासाहेब गोरे, न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी, न्या. व्ही. एम. तारकुंडे, माधवराव गडकरी, प्रतापराव पवार अशा मान्यवरांच्या उपस्थितीत दीड-दोन हजार तरुण तीन दिवस या सामाजिक विचारमंथनात रमले होते. सोलापूर शहरात १९९९ साली महिलांसंबंधीच्या अंधश्रद्धे-बाबत मंथन करणारे दोन दिवसांचे शिबीर अंनिसने घेतले होते, त्याचे सर्व समन्वयन नरेंद्र करीत होता. त्यावेळी प्रमिला दंडवते, रीमा लागू, सोलापूरच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या शालिनी ओक आणि स्त्रीवादी संपादक विद्याताई बाळ यांची उपस्थिती होती. काही वर्षांपूर्वी बार्शी शहरात यज्ञयाग झाला होता, त्याला अंनिसने विरोध केला होता. या सगळ्या प्रत्यक्ष आंदोलनात आणि चळवळीत नरेंद्र आघाडीवरच होता. हीच भूमिका घेऊन त्याने अंधश्रद्धाविरोधी कायद्याचा आग्रह धरला होता. त्याचा पहिला मसुदा त्यानेच करून सरकारी यंत्रणेकडे पाठवला होता. या एकूण विधेयकाचा प्रवासच इतका लांबत गेला होता

तरी नरेंद्रने चिकाटी सोडली नव्हती.

सुमारे दीड महिन्यापूर्वी विधानभवनात नरेंद्रची भेट झाली. त्यावेळी आमच्याबरोबर असलेले आमदार जयदेव गायकवाड यांनी या विधेयकाबाबत विचारले आणि आपला त्याला पूर्ण पाठिंबा आहे, अशी ग्वाहीही दिली होती. याबाबत काही सहकार्य हवे असल्यास सांगा, असेही ते म्हणाले होते. त्या दिवशी संसदीय कार्यमंत्री हर्षवर्धन पाटील यांची तो भेट घेणार होता. विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना या कायद्याबाबत ते अनुकूल आहेत आणि सरकार सकारात्मक राहील असे वाटते, हे त्याने त्या काळात आमच्याशी बोलताना स्पष्ट केले होते. अखेर हा कायदा वटहुकूमाच्या रूपाने नरेंद्रच्या हत्येनंतर आला ... निदान लवकरच विधिमंडळ त्याला मान्यता देऊन तो कायदा सर्वार्थाने अमलात येईल, अशी अपेक्षा आहे. नरेंद्रची हत्या झाली, त्यावेळी डॉ. आनंद तेलतुंबडे यांनी लिहिलेल्या 'खैरलांजी'वरील पुस्तकाची मला आठवण झाली. या पुस्तकात त्यांनी म्हटले होते की, महाराष्ट्र राज्य पुरोगामी आहे हा निव्वळ खोटा प्रचार आहे, ही दंतकथा आहे. फुले-शाहू-आंबेडकरांचे नाव घेणारे हे राज्य आजच्या वास्तवात पुरोगामी कसे म्हणायचे हा प्रश्न माझ्यासारख्या अनेकांना नरेंद्रच्या हत्येने पुन्हा विचारावासा वाटला.

महाराष्ट्रातील पुरोगामी परंपरेला संतांची मांदियाळी सशक्त करते. आधुनिक काळात एकोणिसाव्या शतकातील लोकहितवादी, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, गोपाळ गणेश आगरकर यांची विवेकवादी परंपरा आपल्याला पुढे नेते. हा सगळा पुरोगामी परंपरेतील वसा घेऊन नरेंद्र दाभोलकर पुढे निघाला होता. गांधीजी, सानेगुरुजी, एसेम, नानासाहेब गोरे, मधू दंडवते, मृणाल गोरे यांच्या संस्कारात वाढला होता. साधेपणा व सच्चेपणा त्याच्या विचारात होता. हेच गुणविशेष त्याच्या लेखनातही होते. 'अंधश्रद्धा विनाशाय', 'ऐसे कैसे झाले भोंदू', 'विचार तर कराल?', 'भ्रम आणि निरास', 'लढे अंधश्रद्धेचे' ही त्याच्या पुस्तकांची नावे बघितली तरी त्याचे वेगळेपण लक्षात येते.

आपण महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीबाबत नेहमी बोलतो. मात्र या चळवळीच्या सच्च्या वाटेवरच अनेक धोके उभे असतात. महात्मा फुले यांना मारण्यासाठी मारेकरी आले होते. महात्मा फुले यांच्या कार्याचे मोठेपण त्या अडाणी मारेकऱ्यांनाही लक्षात आले आणि त्यांनी आपल्या हातातल्या कुऱ्हाडी खाली ठेवून जोतिरावांना लोटांगण घातले. एकोणिसाव्या शतकातील ही घटना. विसाव्या शतकात महाराष्ट्रीय असलेल्या एका धर्मवेड्याने दिल्लीत जाऊन महात्माजींची हत्या केली. आणि आता एकविसाव्या शतकात तर साधना कार्यालया-पासून फर्लांगभर अंतरावरच, सकाळी पायी चालत निघालेल्या नरेंद्रला माथेफिरूंनी जिवानिशी मारले.... अजूनही मारेकरी सापडलेले नाहीत ...हा लेख लिहून होईपर्यंत तरी.... सनातन संस्थेसारख्या धर्माचा विपरित अर्थ लावणाऱ्या तेथील प्रमुख मंडळींनी नरेंद्रच्या हत्येबाबत जी टिप्पणी केली ती माणुसकीचा धर्म सोडणारी आहे.

अंनिसचे तरुण कार्यकर्ते आणि दाभोलकरांचे कुटुंबीय आणि आपण सारेच या चळवळीत आता सहभागी आहोत. अहिंसेचा व सत्याग्रहाचा मार्ग सोडायचा नाही, हाच आपल्या सगळ्यांचा संकल्प आहे आणि तेच नरेंद्रचेही खरे स्मरण असणार आहे!


**अरुण खोरे**

तेजलकुंज सी-१४,

जी.ए. कुलकर्णी रोड,

करिश्मा सोसायटी समोर,

कोथरूड, पुणे-४११०३८

भ्रमणध्वनी ९६०४००१८००

arunkhore@hotmail.com






**मूल्य १५० रु.**

**सवलतीत ९० रु.**

**शोध - डॉ. बी.जी. शेखर**

"डॉ. बी. जी. शेखर पाटील हे बहुआयामी व्यक्तिमत्त्व! पोलीस दलात पोलीस उप-आयुक्त म्हणून क्राईम ब्रँच (अंमलबजावणी) येथे कार्यरत असताना प्रत्यक्ष अनुभवलेल्या व अन्वेषण केलेल्या सत्यकथांचा हा संग्रह! 'प्रत्येक गुन्ह्याचा तपास तडीस नेणे' हे त्यांचे ब्रीद ! पोलिसदलातील गंभीर व कठीण प्रसंगांची उकल करताना वापरलेले छोटे-छोटे दुवे, क्लृप्त्या वाचकांची उत्कंठा वाढवितात. प्रत्येक प्रसंग तारखा, घटना व त्यातील व्यक्तींच्या उल्लेखांसह लिहिल्यामुळे पुस्तकाला दर्जेदारपणा प्राप्त झाला आहे. पोलिसदलातील सकलांना, सर्व क्षेत्रातील वाचकांना आणि रसिकांना या काळोखी वाटांचा 'शोध' निश्चित आवडेल याची मला खात्री आहे."

**- पद्मश्री. ना. धों. महानोर**

# असणं आणि नसणं....

राज्यश्री क्षीरसागर

''सर, बरेच दिवसांपासून एक प्रश्न विचारायचा होता...विचारू का?''

एका कार्यक्रमादरम्यान चहापानाच्या वेळी मी डॉ. दाभोलकरसरांना विचारलं.

ते हसले आणि म्हणाले, ''विचार की त्यात काय?''

मी म्हटलं, ''सर, आपण सिनेमे पाहता का?''

ते लगेच उत्तरले, ''हो, पाहतो की.'' या उत्तरानंतर त्यांच्या आवाजातील किंचितशी जाणवणारी औपचारिक छटा एकदम गायब झाली. कदाचित त्यांना असा प्रश्न अपेक्षित नसेल, असं मला त्यांच्या हसण्यावरून वाटलं.

'' 'ओ माय गॉड' पाहिलात?'' माझा पुढचा प्रश्न तयारच होता.

''हो पाहिला,'' त्यांनी पुन्हा हसून उत्तर दिलं.

''आवडला का?'' प्रश्न गंभीर नाहीत हे एव्हाना त्यांच्या लक्षात आलं होतं.

' हो आवडला,'' त्यांचं उत्तर आणि चेहऱ्यावर दिलखुलास हास्य!

''आस्तिक आणि नास्तिक या दोघांना मनोमन सुखावणारा हा सिनेमा होता.'' मी सहज विधान केलं.

त्यावर खळखळून हसून ते म्हणाले, ''हां, हे मात्र एकदम खरं!''

खरं तर डॉ. दाभोलकरसरांबरोबर माझा झालेला हा पहिलाच थेट संवाद...तोही अगदी अलीकडचा. सु. गो. तपस्वी लिखित 'विकासाचे निष्कर्ष : एका तपाच्या अनुभवातून' या पुस्तकावरील परिसंवादाचा



डॉ. नरेंद्र दाभोलकर हे आगरकर, र.धों. कर्वे यांच्या पठडीतील कृतिशील विचारवंत होते. त्यांचे विचार तार्किकतेला व समाजाला पुढे नेणारे होते. ते जसं बोलत तसं जगत. त्यांच्या जगण्यात व विचारांत द्वैत नव्हतं. त्यामुळे त्यांच्या शब्दाला मोल होतं. परखड मतं प्रभावीपणे मांडणारे असे ते होते.

**– महेश एलकुंचवार**
नाटककार, साहित्यिक

'ग्रंथाली'नं आयोजित केलेला तो कार्यक्रम होता. त्या कार्यक्रमात त्यांनी नेहमीप्रमाणे काही रोखठोक विचार मांडले. त्यात शब्दांचा, भावनेचा सच्चेपणा होता आणि इतकी वर्षं चळवळ उभी केल्यानं आलेल्या विविध अनुभवांची जोड त्या विचारांना होती. त्या कार्यक्रमानंतर जेवायच्या वेळी विद्याताई बाळ आणि दाभोलकरसर यांच्याबरोबर पुन्हा अनौपचारिक गप्पांची संधी मिळाली. तेव्हा त्यांचा साधेपणा आणि विचारांचा ठामपणा जास्त जाणवला, आवडला, लक्षात राहिला.

... अचानक डॉ. दाभोलकरसरांची हत्या... संपूर्ण महाराष्ट्र त्या धक्क्यातून सावरण्याच्या प्रयत्नात... काही मान्यवरांशी बोलून डॉ. दाभोलकर यांच्यावर लेख लिहिणार का?... 'ग्रंथाली'चे अरुण जोशी यांची विचारणा....

**तो टास्क मास्टर आणि मी अनिलोत्तम...**

...ज्येष्ठ साहित्यिक अनिल अवचट खूपच अस्वस्थ... म्हणाले, 'काय बोलू?' अजूनही अधूनमधून डोकं खूप दुखतंय... आपण मनाला समजवायचा प्रयत्न करतो पण शरीर मानतंच असं नाही. माझ्या पत्नीच्या निधनाचा धक्का मी सहन केला....पण त्याच्या (डॉ. दाभोलकर) बाबतीत सहन करणं कठीण जातंय. आमचा स्नेह खूप जुना.... आता जवळजवळ चाळीस–पंचेचाळीस वर्षं झाली असतील, आमच्या मैत्रीपूर्ण संबंधांत कधीही ताणतणाव, दुरावा आला नाही. कुणाशी कडाडून भांडण्याचा त्याचा स्वभावच नव्हता. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात संताप येतील अशा अनेक घटना घडत, पण तो कधी कुणाला अपशब्द उच्चारत नसे. त्यामुळे मला त्याचं विशेष आश्चर्य वाटायचं. त्याची भाषा संयत होती, तो अतिशय सौम्य होता. सर्वांना समजून घेणारा होता. स्मशानाजवळून जाताना कुणाला भीतीपोटी राम राम म्हणायचं असेल तर त्यांना म्हणू द्यावं, अशी त्याची भूमिका होती. अंधश्रद्धांना विरोध करताना तो नेहमी म्हणायचा की आपण एका नाजूक विषयाबाबत काम करतो आहोत,

त्याची उकल नाजूकपणेच करायला हवी. तरी त्याची अशी हत्या का व्हावी?

त्याच्या विचारात व कामात सातत्य होतं. तो उपक्रमशील होता. कोकणात 'भुते दाखवा' अशी एक मोहीम होती. त्या मोहिमेत मी सहभागी झालो होतो. रात्रीअपरात्री कुठेही कोणाहीबरोबर जायला तो तयार असे. एकदा तर अमूक एका पुलावर या असा निरोप मिळाला. तो जायला तयार असायाचा, पण लोकच यायचे नाहीत असंही घडायचं. तसं तो फार कठीण काम करत होता आणि एकीकडे संघटनही उभं करत होता. कुठे त्याच्यावर खटले दाखल होते, कुणी त्याच्या सभा उधळून लावायचा प्रयत्न करीत. कुणी टीका करत, वाद घालत. लोकांच्या अशा प्रतिक्रिया येत असत कारण त्याचं काम प्रभावी होतं आणि तो नेटानं आपलं काम चालूच ठेवायचा. त्याला यश येत होतं, त्याच्या कामात तरुणांचा फार मोठा सहभाग होता. गावोगावी पसरलेल्या अंधश्रद्धांबाबत तरुणांमध्ये नाराजी होती, कुणाच्या घरी काही घडलं तरी त्यांना बोलण्याची संधी मिळत नसे. पण, नरेंद्र गावोगावी फिरत असे व तरुणांच्या संपर्कात राहत असे, त्यामुळे तरुणांना बोलण्याची व कृती करण्याची संधी मिळाली. तसंच अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा (अंनिस) जोर प्रबोधनावरही होता. त्याचं संघटनकौशल्य जबरदस्त होतं. सामाजिक कृतज्ञता निधीसाठीही त्यानं खूप प्रयत्न केले.

तो सर्व कामांत गुंतणारा, तर मी कुठेच न गुंतणारा. म्हटलं तर दोन भिन्न प्रवृत्तीचे आम्ही दोघे जण होतो, पण तरी आमची विशेष मैत्री होती. तो मला 'अनिलोत्तम' म्हणायचा आणि मी त्याला 'टास्क मास्टर' म्हणत असे. त्यानं काही काम सांगितलं की मी नाही म्हणत असे. मग तो म्हणायचा, बरं हे नाही तर राहू दे, हे दुसरं काम सोपं आहे, ते करशील का? मग मला नाही म्हणणं कठीण असायचं. मी हो म्हटलं की तो म्हणायचा, अरे, हे करणार आहेसच तर पहिलंही काम कर ना!– असं बोलून तो काम माझ्या गळ्यात घालायचा. साधना साप्ताहिकाचं काम हाती घेतल्यावर त्यानं कितीतरी बदल घडवून आणले. व्यावसायिक बाजू बळकट केली. साधना मीडिया सेंटर उभं राहिलं. साधनेच्या कामात त्यानं विनोद शिरसाठ या तरुण संपादकालाही छान तयार केलं आहे. बालसाधनेसाठी मी लिहावं असं तो नेहमी म्हणायचा.

पूर्वी तो माझ्याकडे मुक्कामाला येत असे. आमचं कुटुंब व त्याचं कुटुंब यांच्यात फार मैत्रीपूर्ण व स्नेहाचं नातं होतं. आम्ही त्यांच्याकडे साताऱ्याला जात असू, मग कधी महाबळेश्वर तर कधी कास पठार अशी आमची दोन कुटुंबांची भटकंतीही होत असे. तो एक चांगला मित्र व माणूस होता. आमच्या मनमोकळ्या गप्पा व चर्चा होत असत. मी त्याला म्हणायचो की देव आहे की नाही यावर आपण बोलू नये. लोकांना जर देव आहे असं मानायचं असेल तर मानू दे. आपण त्यातील अंधश्रद्धांबाबत अधिक बोलायला हवं. त्यामुळे डॉ. श्रीराम लागू व तो कधी एकत्र एका व्यासपीठावर आले आणि डॉ. लागूंनी जर म्हटलं की परमेश्वराला रिटायर करा, देव नाहीच वगैरे तर तो व्यासपीठावरच स्पष्ट करीत असे की अंनिसची ही भूमिका नाही. देवाचं अस्तित्व ज्याला मानायचं आहे त्यानं मानावं, धर्माचं पालन ज्याला करायचं आहे त्यानं ते करावं, पण अंधश्रद्धा जोपासू नयेत, शोषण करू नये, नवस करू नये, नरबळी देऊ नयेत. त्याच्यावर कुणाला व का गोळी झाडावीशी वाटली असेल? त्याच्या विचारांचा सामना विचारांनी करता आला नाही म्हणून अशी हत्या झाली असावी का, असा प्रश्न मनात येतो.

अलीकडे आमच्या भेटी जरा कमी झाल्या होत्या. पण अधूनमधून फोनवर बोलणं होत असे. तो मला मुद्दाम ख्यातनाम लेखक, कवी असं म्हणायचा. ख्यातनाम हा शब्द तो अनेकदा वापरत असे. सुरेश भटांच्या गझला त्याला तोंडपाठ होत्या. गाण्याची त्याला आवड होती. वरकरणी तो आणि त्याचं काम असा एकारलेला वाटत असे. पण तसा तो कोरडा नव्हता, त्याला चांगलं ऐकावंसं, पाहावसं वाटत असे. तो इतका आमच्यातीलच होता आणि आमचाच होता हे तो गेल्यानंतर ते लक्षात येतंय. त्याचं असणं व काम करणं किती गृहीत धरलं होतं आम्ही, हे आता जाणवतंय.

**हाडाचे कार्यकर्ते व उत्तम संघटक**

"डॉ. नरेंद्र दाभोलकर हे हाडाचे कार्यकर्ते होते. त्याचं संघटनकौशल्य उत्तम होतं. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्याबाबत एक प्रदीर्घ लेख गेल्या वर्षी त्यांनी 'अंतर्नाद'साठी लिहिला होता. त्यांची हत्या निंदनीय आहे, या धक्क्यातून मी अजून सावरतो आहे." बदलता भारत या ग्रंथाचे लेखक व अंतर्नाद या मासिकाचे संपादक भानू काळे बोलत होते. "खरं तर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्यापेक्षा त्यांचे बंधू दत्तप्रसाद दाभोलकर यांच्याबरोबर माझी अधिक मैत्री होती. दत्तप्रसाद दाभोलकर यांच्यापेक्षा नरेंद्र दाभोलकरांचा पिंड जरा वेगळा होता. नरेंद्र यांनी महाराष्ट्रात अंनिसचं उभं केलंलं कार्य वाखाणणीय आहेच. मुख्य म्हणजे, अंनिसचे कार्यकर्ते गावोगावी आहेत आणि प्रसंगी ही मंडळी आपला जीव धोक्यात घालून कार्य करीत असतात. कारण ज्या बुवा वा महंतांच्या विरोधात ही मंडळी काम करीत असतात; त्यांची स्थानिक पातळीवर दहशत असते. शिवाय, अंनिसला कोणत्याही प्रकारचं अधिकृत फंडिंग नाही. खऱ्या अर्थानं लोकसहभागातून चालू असलेली ही चळवळ आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी यासाठी घेतलेले कष्ट हे आदर्शच म्हटले पाहिजेत.

गेली अनेक वर्षे ते लाल एस.टी.नं प्रवास करीत होते. साधेपणा हा त्यांचा गुणविशेष म्हटला पाहिजे. हत्या झाली तेव्हा त्यांच्या खिशात बसची दोन तिकिटं सापडावीत हे या संदर्भात बोलकं ठरतं. ते रात्री आले व त्याच कपड्यांमध्ये सकाळी फिरायला बाहेर पडले, हेदेखील विशेष ठरतं. निर्व्याज (अनअझ्युमिंग) असं त्याचं व्यक्तिमत्त्व होतं. महाराष्ट्रातील काही मोजक्या नियतकालिकांच्या संपादकांची संवाद सभा प्रथमच पुण्यात आयोजित

करण्यात आली होती. 'साधना'चे संपादक म्हणून ते त्या सभेला आले व दिवसभर उपस्थित राहिले हेदेखील महत्त्वाचं आहे. तेव्हादेखील त्यांनी मोकळेपणानं व प्रभावीपणे मतं मांडली होती. कुठे नवीन काही घडतं आहे का ते पाहणं, त्याला उत्तेजन देणं हे त्यांच्या स्वभावचं वैशिष्ट्य होतं. ते बुद्धिवादी होते.

नरेंद्र दाभोलकर यांच्या विचारांमध्ये एक मोकळेपणा अलिकडे येऊ लागला होता. उदाहरणार्थ, चेतन पंडितांसारख्या अणुऊर्जेला पाठिंबा देणाऱ्या, मोठी धरणं हवीत असं म्हणणाऱ्या व्यक्तींचं लेखन त्यांनी अलीकडे साधनेत स्वीकारलं. हा मोकळेपणा पूर्वी साधनेत नव्हता. या संदर्भात एक गोष्ट अशी की नरेंद्र दाभोलकरांनी साताऱ्यामध्ये एकदा पत्रकार निखिल वागळे यांची मुलाखत घेतली होती. तेव्हा निखिल वागळे यांनी दाभोलकरांना बरेच शाब्दिक चिमटे घेतले होते. तेव्हा वागळे यांचं एक विधान असं होतं की, परिवर्तनवादी चळवळीतील माणसं अपरिवर्तनीय असतात. तेव्हा दाभोलकर काही बोलले नाहीत, मात्र त्यांनी स्वत:मध्ये बदल घडवून आणले. ते वैचारिक खुलेपणाकडे जात होते. त्यांच्या विचारांची मांडणी चांगली होती. त्यांच्यामध्ये प्रचंड ऊर्जा व आशावादी दृष्टिकोन होता. उपक्रमशीलता हा संघटनकौशल्याला पूरक असा गुण त्यांच्यात होता. अनेक नवनवे उपक्रम त्यांनी राबवले. कार्यकर्ता ते नेता असा त्यांचा प्रवास झालेला दिसतो. पण तरी त्यांचं मूळचं हाडाचं कार्यकर्तापण बाजूला पडलं नाही. किंबहुना असे कार्यकर्तापण असतानाही व्यावहारिक शहाणपण त्यांनी अंगी बाणवलं होतं. त्यामुळे त्यांना साधनेसाठी स्थावर निधी उभारता आला. अर्थात, आप्पासाहेबांची– सा. रे. पाटील यांची – त्यांना खूप मदत झाली. पण दाभोलकरांचं व्यवहारकौशल्य यात होतंच. शासनाकडूनही त्यांनी निधी मिळवला. साधना साप्ताहिकाचं स्वरूप वैचारिक असलं तरी त्यांनी ते जीवनाच्या सर्व अंगाना समजून घेईल असं केलं. म्हणूनच मला आवडलेले चित्रपट या विषयावर साधनेचा विशेषांक अलीकडे प्रसिद्ध झाला आहे. अर्थात याचं श्रेय कार्यकारी संपादक विनोद शिरसाठ यांचंही आहेच.

अंधश्रद्धा निर्मूलनाचं त्यांचं कार्य ही दाभोलकरांची निजखूणच (आयडेन्टिटी) बनली होती. पण या कामाला जशी प्रसिद्धी मिळाली तशी त्यांच्या व्यसनमुक्तीच्या कार्याला पुरेशी प्रसिद्धी मिळाली नाही, याचा उल्लेख इथे अवश्य केला पाहिजे. मद्यपानाला त्यांचा विरोध आहे, ही त्यांची भूमिका कधीच फारशी पुढे आली नाही.''

इथून आमची चर्चा वळली ती धर्म, श्रद्धा आणि बुद्धिप्रामाण्यवाद या विषयांकडे. भारतातील अन्य प्रांतांच्या तुलनेत महाराष्ट्रात फार कडवा बुद्धिप्रामाण्यवाद आहे. तो समजून घेऊन त्यानुसार आचरण करणारी मंडळी संख्येनं थोडीच असतात. धर्म, श्रद्धा, रुढीपरंपरा, संस्कृती या जगभरात सर्व देशांमध्ये असतात. या सर्वांमधील अनेक वाईट बाबी दूर करणं गरजेचं असतं. स्वामी विवेकानंद यांनीही धर्मावर, वाईट परंपरांवर चांगलीच टीका केली आहे. पण धर्मात शिरून सुधारणा केल्या पाहिजेत असं त्याचं मत होतं. नरेंद्र दाभोलकर यांनी स्वामी विवेकानंद समजून घ्यायला पाहिजे होते, असं मत भानू काळे यांनी मांडलं.

### अंधश्रद्धा निर्मूलनासाठी व्यापक सौंदर्यदृष्टी हवी

''डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा व माझा फारसा वैयक्तिक परिचय नव्हता. पण त्यांचं कार्य मोठंच होतं आणि त्यांची हत्या ही दुर्दैवी घटना आहे'' असं म्हणून प्रसिद्ध चित्रकार व लेखक रवी परांजपे यांनी अंधश्रद्धा निर्मूलनासाठी समाजात व्यापक सौंदर्यदृष्टी रुजायला हवी अशी मांडणी केली. तसंच हिंदू समाजाला सुधारण्याची गरज आहे असंही स्पष्ट केलं. एकूणच भारतातील सामाजिक, राजकीय प्रश्नांचा विचार ते चित्रकलेच्या अंगानं करतात; त्यामुळे त्यांचे विचारही चित्रकलेच्या भाषेतच व्यक्त होतात. त्यांना अपेक्षित असलेल्या व्यापक सौंदर्यदृष्टीचं स्वरूप सार्वजनिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आणि राष्ट्रीय इतकं विविधांगी असं आहे. ही व्यापक सौंदर्यदृष्टी हिंदू समाजाला मिळालेली नाही, म्हणून सौंदर्यदृष्टीहीन पोकळीत हिंदू समाज वावरतो आहे, असं सांगून ते म्हणतात, सार्वजनिक जीवन–व्यवहारांत मनामनांत व्यापक सौंदर्यदृष्टी रुजवणारी परंपरा व शोषण करणारी अंधश्रद्धा यांतील फरक समजून घेत, वाईटाला दूर करून समाजाची प्रगती व्हायला हवी. सुजाण, सुविचारी नागरिक याद्वारे घडेल. त्यामुळे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचं अंधश्रद्धा निर्मूलनाचं कार्य महत्त्वाचं आहेच पण चांगल्या समाज–निर्मितीसाठी मला अभिप्रेत असलेली व्यापक सौंदर्यदृष्टी रुजवण्यासाठी ते पुरेसे ठरत नाही असं वाटतं.

### ऐतिहासिक कार्य

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी केलेलं कार्य ऐतिहासिक असून त्याची नोंद महाराष्ट्राच्या इतिहासात घ्यावीच लागेल इतकं ते महत्त्वाचं आहे. साधी राहणी, तत्त्वनिष्ठा आणि वैचारिक बांधिलकी हे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील विशेष गुण म्हटले पाहिजेत. त्यांची हत्या निषेधार्हच असून महाराष्ट्राच्या वातावरणाला धोका निर्माण करणारी आहे, असं मत मांडलं आहे रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे संचालक विनय सहस्रबुद्धे यांनी.

चळवळीतील कार्यकर्तेपण आणि व्यावसायिक विचार हे दोन्ही त्यांच्या व्यक्तिमत्वात होतं. 'साधना' साप्ताहिकात त्यांनी अनेक कालसुसंगत बदल केले हा त्यांच्या ताज्या व नव्या दृष्टिकोणाचा परिणाम होता. शोषण करणाऱ्या चुकीच्या पद्धतींपासून समाजमन दूर नेण्याचा मोठा प्रयत्न त्यांनी केला.

अंधश्रद्धा दूर व्हाव्यात या संदर्भातील जादूटोणा विधेयकाबाबत मात्र अनेकांच्या

मनात संभ्रम आहे. सांस्कृतिक विविधतेनं नटलेल्या भारतीय समाजात रूढी, परंपरा, श्रद्धा, अंधश्रद्धा यांची सरमिसळ झाली आहे. यासाठी समाजाचं प्रबोधन करण्याचीच गरज अधिक आहे. काही बाबींसाठी कायद्याचं पाठबळ मिळालं तरी अनेकदा पळवाटाही शोधल्या जातात. त्यामुळे कायद्याच्या मर्यादा लक्षात घेणं गरजेचं आहे. उदाहरणार्थ, भारतात कायद्यानं आरक्षण आणता आलं पण सामाजिक समरसता अजून आणता आलेली नाही. काही उद्दिष्टं प्रबोधनानंच गाठता येतात. त्यामुळे अनेक बाबींसंदर्भात प्रबोधनावर भर हवा असं सहस्रबुद्धे म्हणाले.

**विवेकवाद**

डॉ. दाभोलकर सरांचं असणं आणि नसणं.... विचारवंतांच्या नसण्यानं विचारांची आवर्तनं अधिक गतिमान झाली. श्रद्धा, अंधश्रद्धा रूढी, परंपरा जपणारं एक मानवी मन असतं. मनाचं कार्य म्हणजे मेंदूचं कार्य. विज्ञान-तंत्रज्ञानामुळे घडून आलेलं आधुनिक मेंदूसंशोधन काय सांगतं? उत्क्रांतीच्या काळापासून घडत आलेल्या आणि आजही नवनवीन अनुभवांनी घडत असलेल्या मेंदूच्या रचनेतच एक लवचीकता आहे. विज्ञानाच्या भाषेत त्याला 'मेंदूची प्लॅस्टिसिटी' असं म्हणतात. नवीन गोष्टींशी जुळवून घेण्यासाठी असलेलं मेंदूचं ते विशेष कार्य आहे. तसंच कोणत्याही कठीण परिस्थितीत उभं राहण्यासाठी, जगण्याची ऊर्मी जागवण्यासाठी मनामनांत एक 'सर्व्हायवल इन्स्टिंक्ट'ही असतो. त्यामुळे आपण सर्व जण विज्ञानालाही जवळ करतो आणि आवश्यकतेनुसार श्रद्धा व परंपरा यांनाही. विज्ञानवादी मनंही यातून सुटत नाही. पण याचबरोबर विवेकवादाची कास धरणारंही मानवी मनच असतं. आपला सर्वांचा विवेकवाद जागता ठेवणं हीच त्यांना आदरांजली ठरेल.


**राज्यश्री क्षीरसागर**

फ्लॅट ६०२, ए.जे. वृंदावन,
सर्व्हे नं. २, सीटीएस ६८७,
कर्वेनगर (विठ्ठल मंदिराजवळ),
पुणे ४११ ०५२
भ्रमणध्वनी ९०११०१०४६८
k.rajyashree@gmail.com



॥ग्रंथाली॥



**घडत गेलेली गोष्ट**

**विजया राजाध्यक्ष**


मूल्य २२५ रु.
सवलतीत १३५ रु.

''तुमचं काय चाललंय मॅडम? लेखन वगैरे...''
''विशेष काही नाही गं. बघू काही सुचलं तर. ते आपल्या हातात थोडंच असतं? काहीतरी सापडतं अचानक! पण ते जरी लिहिलं तरी वाटतं, अजून काहीतरी उरलं आहे. मी त्याच्यापर्यंत पोहोचू शकत नाही... एका अर्थानं ते बरंच असतं म्हणा! जाऊ दे, उगाच काहीतरी बोलत बसले.''
कॉफी घेता घेता सुजाता म्हणाली,
''मॅडम, तुम्ही एक कथा लिहीत होतात ना! तुम्ही तसं सांगितल्याचं आठवलं. पूर्ण झाली का ती?''
''छे गं! कथा कधी संपूर्ण, समाप्त होतात का? त्या आपल्या मनात घडतच राहतात!''

**अंतरंग**

**विजया राजाध्यक्ष**

मूल्य १२५ रु.
सवलतीत ७५ रु.



'अंतरंग'मधील लेखांचा कदंब, तळ्यात...मळ्यात, अनुबंध व स्वच्छंद या इतर पुस्तकांमधील लेखांसोबत विचार करताना पुन:पुन्हा जाणवते की, ललितलेख निबंध हा प्रकार खरोखरीच लवचीक, मुक्त आहे. कधी ती कथा असते, कधी संक्षिप्त प्रवासवर्णन, कधी व्यक्तिचित्र, तर कधी व्यक्तिचित्रात अंतर्भूत असलेली समीक्षाही. 'सहा दिवसांचा वानप्रस्थ' या माझ्या दीर्घ ललितनिबंधात, त्या घाटाची ही सगळी रूपे सामावलेली आहेत. तो वाचला की वाटते, आपण या वाटेने अजून चालत राहायला हवे...
कालांतराने थोडीफार चाललेही. ते लेख एकत्रित करण्याची इच्छा होती. 'ग्रंथाली'च्या अगत्यामुळे ती फलद्रूप होत आहे. खरे म्हणजे माझा 'फॉर्म' कथा हाच, पण ललित लेखनाच्या वेगळ्या वाटेने जाताना मन नेहमीच ताजेतवाने राहिले, हे मात्र खरे!

# चला मग, आपापला खारीचा वाटा उचलुया!

अनुराधा ठाकूर

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या ही कोणाही सुसंस्कृत माणसाला सुन्न करणारी घटना आहे. टीव्हीवर व वृत्तपत्रांत 'खून' हा शब्द वापरून मिडियाने मराठीचे ज्ञानही प्रदर्शित केले आहे! बातमी सनसनाटी असल्याने दोन दिवस माध्यमांना दुसरा विषय नव्हता.

मारेकऱ्यांनी हे कृत्य पैशांसाठी केले म्हणावे, तर पेशाने डॉक्टर असूनही फकिराचे जिणे ज्याने आपणहून स्वीकारले, त्याच्याजवळ काय असणार? कौटुंबिक वैमनस्यातून काही घडले असावे, हेही शक्य नाही. इतका निर्मळ व पारदर्शी माणूस शोधूनही सापडणार नाही! डॉ. दाभोलकरांच्या विचारसरणीला प्रखर विरोध असणाऱ्याचेच हे कृत्य असावे हे तर्कसंगत वाटते. ते लोक कोणत्याही पंथाचे असोत, ते अत्यंत भ्याड आहेत. दाभोलकरांच्या मारेकऱ्यांत नि:शस्त्र माणसावर गोळ्या झाडायचा कमकुवतपणा आहे, तो कुठल्याही धर्म/पंथाच्या शिकवणुकीतून येऊ शकत नाही.

माझ्या कुटुंबाचे डॉ. दाभोलकर यांच्याशी दूरचे नाते आहे. त्यांच्या आमच्याकडील मोजक्याच वास्तव्यात मला त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी मिळाली.

देव न मानणाऱ्या व बुद्धिप्रामाण्यवादी माणसास मोठे मनोधैर्य असावे लागते. प्रत्येक गोष्ट तर्काच्या व विज्ञानाच्या कसोटीवर घासून पाहणारा मनुष्य हा निर्भीड वृत्तीचा असतो. आम्ही सर्वसामान्य माणसे भित्री असतो. देव व दैवाच्या आधारावर आयुष्यातील बरेवाईट पचवण्याचा प्रयत्न करतो.

मी डॉ. शैला दाभोलकर यांना भेटण्यासाठी मंगळवारी संध्याकाळी साताऱ्याला पोचले. बाई खंबीर व धीरोदात्त वृत्तीच्या आहेत. म्हणूनच त्या दाभोलकर यांसारख्या माणसास इतकी वर्षे सांभाळू शकल्या आणि त्यांना समाजकार्य व अंधश्रद्धा निर्मूलन समितीची कामे करण्यास मुक्त ठेवू शकल्या. त्यामुळे त्यांच्यामध्ये एका हतबल, रडणाऱ्या बाईचे स्वरूप अपेक्षित नव्हतेच.

शैलाताई बरेच काही बोलत होत्या. त्यांना भेटायला येणाऱ्यांची रीघ लागली होती. घरासमोरील मोकळ्या मैदानात डॉ. दाभोलकरांचे पार्थिव ठेवले होते व प्रचंड जनसमुदाय शोकाकूल होऊन पण शिस्तीने दर्शन घेत होता. तेवढ्यात मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, गृहमंत्री आर.आर. पाटील आणि इतर काही मंत्री व त्यांचा लवाजमा आत आला. दोघांनी शैलाताईंचे सांत्वन केले. त्यावर शैलाताईंनी त्यांना परखड शब्दांत उत्तर दिले; ते असे–

''तुम्ही माझे सांत्वन करायला आलात याबद्दल धन्यवाद. परंतु दाभोलकर या बिलाबाबत तुमच्याशी चर्चा करण्यासाठी तुम्हाला भेटायला अनेकदा आले, तासन् तास थांबले, तुम्ही त्यांची साधी भेटही घेतली नाही. तुमच्याकडून मोठ्या अपेक्षा होत्या. तुमचे हस्तक उठण्यासाठी खुणा करत आहेत. पण मला जे सांगायचे आहे, ते मी सांगीनच. तुम्हाला खरोखर दु:ख झाले असेल व दाभोलकरांना श्रद्धांजली वाहायची असेल तर त्यांचे हे (जादुटोणा, अघोरी विद्या व नरबळीरोधक) बिल पास करा.''

मुक्ता, डॉक्टरांची मुलगी म्हणाली– ''अशी असुरक्षितता असेल व सरकार काहीच करत नसेल तर सर्वसामान्य कार्यकर्ता सामाजिक काम पुढे कसे चालू ठेवेल? समाजकारण करणारे सर्व लोक वैयक्तिक आयुष्याची तमा न बाळगता नि:स्वार्थपणे कार्य करतात. ते त्यांनी कोणाच्या भरवशावर करावे? उत्तर आहे तुमच्याकडे? आमचं माणूस तर गेलंच. असे आणखी किती गेल्यावर तुम्ही जागे होणार?''

मग एकेक करत अनेक स्त्रिया, कार्यकर्ते बोलले. सर्वांचा मुद्दा हाच, की सरकार निष्क्रिय आहे, आश्वासने पोकळ आहेत, आमचा तुमच्यावर विश्वास कसा बसावा? तुमच्या राज्यात सर्वसामान्य, कायद्याने चालणाऱ्या माणसांचे भवितव्य काय?

मलाही राहवले नाही. मी म्हटले, ''एक सर्वसामान्य नागरिक या नात्याने मला अत्यंत काळजी वाटते, की अभिव्यक्ती–स्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य हा लोकशाहीचा पाया आहे, तोच आज पायदळी तुडवला गेला आहे. आपले भवितव्य काय? दुसरे म्हणजे धर्माच्या नावाखाली चालणारा हा दहशतवाद आहे. तो अत्यंत घातक आहे. त्याबाबत आपण त्वरित पावले उचलावीत अशी विनंती आहे.''



एका घरात राज्यप्रमुख व मंत्री जातात. त्यांना स्पष्ट शब्दांत जाब विचारला जातो, सर्वसामान्य माणसे धीटपणे बोलतात व राज्यातील दोन ज्येष्ठतम मंत्री मान खाली घालून सारे ऐकतात, हे दृश्य खूप काही सांगून गेले! या घटनेची मी साक्षीदार होते हे माझे भाग्य की दुर्भाग्य?

त्यानंतरही जमाव बाहेर सरकारच्या धिक्काराच्या घोषणा देत होता.

पृथ्वीराज चव्हाण हे सच्चे व प्रामाणिक नेते आहेत. आर.आर. पाटील हेही त्यांचे खाते संयत व तोल सांभाळत चालवतात. मला ते दोघे इतक्या दूरवर भेटायला आले याचे आश्चर्य वाटले. असेही वाटले, की हे पृथ्वीराज चव्हाणच करू शकले! पण मग हे चांगले नेतेही असे हतबल का? त्यांनी ताबडतोब सर्व प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले व त्या बिलाचा मसुदा राज्यपालांकडे मंजुरीसाठी त्याच दिवशी गेला देखील. लोकांचा प्रक्षोभ लक्षात घेता ते विधेयक हिवाळी अधिवेशनात मंजूर होईलही. पण त्यासाठी एका सोन्यासारख्या सामाजिक नेत्याची आहुती गेली हे आपले दुर्दैव!

घरचा कर्ता पुरुष नादान असला, तर कुटुंबातील सर्वांचाच आत्मविश्वास खच्ची होतो. तेच आपल्या देशाबाबत घडत आहे. वर दिल्लीत जो राजकीय धोरणात्मक पक्षाघात (political/policy paralysis) झाला आहे, त्यामुळे राज्यस्तरावरही जोरदारपणे काम होत नाही; ठोस पावले उचलल्यास वरून पाठिंबा मिळेल, अशी शाश्वती नाही. उलट, येणाऱ्या निवडणुका व जातिधर्माचे राजकारण लक्षात घेता चपराक बसण्याचीच शक्यता जास्त. या परिस्थितीत आपण काय करावे? माझ्यासारखेच अनेकजण आज या संभ्रमात आहेत.

महाराष्ट्राला पुरोगामी विचारवंतांची कमतरता नाही. नवीन विचार सुरुवातीला धक्कादायक वाटतात. ते लोकांच्या पचनी कालांतराने, धीम्या गतीनेच पडतात. आपण सुशिक्षित व सुसंस्कृत लोक एक वाट चोखाळू शकतो. आसपासच्या लोकांत अंधश्रद्धेबाबत जागरुकता निर्माण करणे, बाबा-बापूंच्या भजनी लागलेल्या अनेक सुशिक्षितांना त्यातील पोकळपणा पटवण्याचा प्रयत्न करणे, मित्रमैत्रिणींच्या वर्तुळात त्या विषयाचा ऊहापोह करणे, घरी काम करणाऱ्या लोकांना उपासतापास न करण्याचे महत्त्व पटवणे, गणपतीच्या नावाखाली मोठा धंदा करणाऱ्या मंडळांत जाऊन दर्शन घेऊन भरपूर पैसे, फुले, नारळ वाहण्याचे काम न करणे, अशी सुरुवात तर आपण करू शकतो. चला मग, आपापला खारीचा वाटा उचलुया!

**अनुराधा ठाकूर**
anuradha333@gmail.com



प्रभाकर वाईरकर



# हरहुन्नरी व्यंगचित्रकार सुधीर तेलंग

**प्रभाकर वाईरकर**, व्यंगचित्रकार

प्रत्येक कलावंताची एक सुप्त इच्छा असते, की दिग्गजाने त्याच्या कलेचा प्रत्यक्ष आस्वाद घ्यावा वा त्याच्या पाठीवर कौतुकाची थाप मारावी. अचूक नेम धरून 'लगोरी' फोडणाऱ्या खेडूत मुलाला वाटावे आपली पाठ गावच्या पाटलाने थोपटावी. शेतात 'तरवा' लावताना सहज ओवी गाणाऱ्या कुळवाडणीला वाटावे आपल्यावर दोन कौतुकाचे शब्द उधळावे गावातल्या भजनीबुवाने. कुबट खोलीत रात्रभर आशिकांची मने रिझवणाऱ्या मुजरा करणारीचा एक डोळाही शहरातील एखादा दिग्गज आपली 'इज्जत' करेल या आशेवर असतो, तर दोन वेळा पोटाची खळगी भरू न शकणाऱ्याच्या पोटी जन्माला आलेला पोरगा कधीतरी 'सरकारी' नजर आपल्यावर पडेल म्हणून धावपट्टीचा चिखल करतो. पण प्रत्येकाचे ईप्सित साध्य होत नाही किंवा सुप्त इच्छेला समाधानाची गोड फळे लागतील याची काही गॅरंटी नाही.

पण एक मुलगा मात्र दुर्दम्य ईर्ष्या ठेवून वयाच्या पाचव्या-सहाव्या वर्षापासून व्यंगचित्रे चितारू लागला आणि त्याची परिणती एक प्रसिद्ध व्यंगचित्रकार होण्यात झाली. भारताच्या तीन माजी पंतप्रधानांनी त्याच्या व्यंगचित्र प्रदर्शनांना भेट देऊन त्याच्या व्यंगचित्रांना मानाचा मुजरा केला. अशा सुदैवी व्यंगचित्रकाराचे नाव आहे सुधीर तेलंग.

पावला-पावलागणिक इतिहासाचा हुंकार देणाऱ्या राजस्थानातील बिकानेर या प्रसिद्ध शहरी सुधीर यांचा जन्म झाला. चोवीस तास उसंतविरहित उंदरांची वर्दळ असणारे



सुधीर तेलंग

करणीमातेचे मंदिर, हल्दीरामची मिठाई-'भुजिया' आणि समृद्ध महाराज डॉ. करणी सिंग आणि वडिलांची प्रिंटिंग प्रेस अशा वातावरणात सुधीर यांचे बालपण घडले. राजस्थान विश्वविद्यालयातून बीएस्सीची पदवी धारण केल्यानंतर त्यांनी इंग्रजी वाङ्मयामध्ये एम.ए. केले.

व्यंगचित्रकलेची आवड कशी निर्माण झाली हे सांगताना ते म्हणतात, ''वयाच्या चौथ्या-पाचव्या वर्षी फॅन्टम, ब्लाँडी, मॅन्ड्रेक, टीन्टीन्, गार्थ अशी कॉमिक्स हातात पडायला लागली. त्या सर्व व्यक्तिरेखांचा परिणाम मनावर एवढा झाला की आपणही अशी चित्रे रेखाटली पाहिजेत म्हणून मी वडिलांच्या प्रिंटिंग प्रेसमध्ये जाऊन बसू लागलो. पेपरचा सुकाळच होता त्यामुळे चिकाटीने मनसोक्त व्यंगचित्रे चितारू लागलो.''

प्रेससाठी कशी व्यंगचित्रे असावीत व त्यामध्ये तांत्रिक बाबी काय असतात याची जाणीव त्यांच्या वडिलांना असल्याने ते सुधीरकडून आपल्या मार्गदर्शनाखाली 'तशा' प्रकारची चित्रे तयार करून घेऊ लागले. एक प्रकारे वडीलच त्यांचे 'गुरू'!

ऑक्टोबर १९७० मध्ये, वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचे पहिले व्यंगचित्र 'हिंदुस्थान' या राष्ट्रीय पातळीवरील वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झाले. त्यावेळी त्यांना एवढा आनंद झाला की ते म्हणतात, ''पद्मश्री ॲवॉर्ड मिळाले तेव्हा जेवढा आनंद झाला त्यापेक्षा कित्येक पटींनी जास्त तो आनंद होता.'' त्यांनी या वर्तमानपत्राच्या दहा प्रती खरेदी केल्या. त्यानंतर त्याच वर्तमानपत्रामध्ये आणखी व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली. काही काळानंतर त्यासाठी त्यांना पंचवीस रुपयांची मनीऑर्डर मिळाली. पहिल्या कमाईचा एवढा आनंद झाला की त्यांनी पंचवीस रुपयांचा सन ग्लास खरेदी केला आणि राजेंद्रकुमार-सायरा बानू यांचा 'झुक गया आसमान' हा चित्रपट तो गॉगल घालून संपूर्ण पाहिला. हे सांगताना त्यांच्यामध्ये बालक लपल्याचा त्यांना होणारा आनंद त्यांच्या शब्दांतून निथळत असतो.

ते झपाटल्याप्रमाणे व्यंगचित्रांच्या - चित्रकलेच्या दुनियेत वाट धुंडाळू लागले. रेल्वे स्टेशन, प्राणिसंग्रहालय, बाजार वगैरे ठिकाणी जाऊन तिथली माणसे-परिसर न्याहाळू लागले व त्यांची स्केचेस करू लागले. त्याच दरम्यान त्यांनी कॉलेजचे शिक्षणही सुरू ठेवले. त्याच काळात आर.के. लक्ष्मण, अबू अब्राहम यांची व्यंगचित्रे ते न्याहाळू लागले-समजावून घेऊ लागले. बीएस्सी पदरात पाडून घेतली. डॉक्टर होण्याच्या ईर्ष्येवर चित्रकार होण्याच्या ईर्ष्येने मात केली. अचानक

वयाच्या बाविसाव्या वर्षी मुंबईच्या टाइम्स ऑफ इंडिया बिल्डिंगच्या पायऱ्या चढण्याचा योग आला आणि इलेस्ट्रेटेड विकली ऑफ इंडियाच्या कार्यालयात व्यंगचित्रकार म्हणून रुजू झाले.

विकलीचे संपादक के.सी. खन्ना यांनी त्यांना खूप प्रोत्साहन दिले. इकॉनॉमिक टाइम्सचे संपादक एक.मे.बी. नायर यांनी पहिल्या पानासाठी राजकीय व्यंगचित्र चितारण्याची संधी दिली, तर मॅविन कर्वे यांनी इविनिंग न्यूजमध्ये 'मानाचे पान' दिले आणि फिल्मफेअरचे विक्रम सिंग यांनी त्यांच्या व्यंगचित्रांचा पुरेपूर उपयोग करून घेतला. अशा प्रकारे मुंबईमध्ये त्यांची घोडदौड सुरू असताना त्यांच्या 'घोड्याने' एवढी उंच उडी मारली की त्यांची ती 'हिंदुस्थान टाइम्स' या दिल्लीस्थित वर्तमानपत्रामध्ये स्थिरावली.

चित्रकलेचे विद्यालयीन शिक्षण त्यांनी घेतलेले नाही त्यामुळे त्यांना स्फुरेल त्याप्रमाणे चित्रकलेची शैली त्यांनी आत्मसात केली. व्यंगचित्र चितारताना ते पेन व काळी इंक याचा वापर करतात. पेनचे निब हे बोरूप्रमाणे तिरका 'कट' असलेले व जाडसर फटकारा येईल असे वापरतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक फटकारा हा आपोआपच जाड-बारीक पद्धतीने चितारला जातो.

कमीत कमी रेषांचा वापर ते व्यंग-चित्रांमध्ये करतात. इतर व्यंगचित्रकारांपेक्षा सुधीरजी डॉ. मनमोहनसिंग यांचे कॅरिकेचर चितारतात ते अतिशय वेगळे असते. मनमोहन सिंग यांचे केसविरहित डोके व मागच्या बाजूला त्यांचा फेटा, मिशी व दाढी काही रेषांनी दाखवतात.

सुधीरजी हे राजकीय चित्रकार असल्याने त्यांनी प्रत्येक व्यंगचित्रामध्ये त्या-त्या वेळच्या राजकीय परिस्थितीवर अचूक भाष्य केले आहे.

नरसिंहराव पंतप्रधान असताना देशाची आर्थिक परिस्थिती डबघाईला आलेली होती. त्याच्या मंत्रिमंडळामध्ये डॉ. मनमोहन सिंग हे अर्थमंत्री होते. आर्थिक स्थिती सावरण्यासाठी त्यांनी मनमोहन सिंग यांचा कसा उपयोग केला हे सोबतच्या



व्यंगचित्रामध्ये अतिशय मार्मिक पद्धतीने दिसते आहे. नरसिंहरावांच्या हातामध्ये भिकेचे पात्र आहे व त्यामध्ये आहेत अर्थमंत्री मनमोहन सिंग आणि मनमोहन सिंग यांच्या हातामध्ये दुसरे भिकेचे पात्र आहे असे अतिशय बोधमय चित्र!

सरकारने आपल्या देशाच्या सुरक्षेचे कसे वाटोळे केले आहे हे दाखवण्यासाठी महात्मा गांधींच्या समाधीचा उपयोग सरकारचे थोबाड रंगवण्यासाठी खोचक पद्धतीने केला आहे. समाधीच्या भोवताली सिक्युरिटी गार्ड आहेत ते गांधीजींना म्हणतात, ''तुम्ही या ठिकाणी राहू शकता; पण तुमच्या संरक्षणाची समस्या असल्याने तुम्हाला ही जागा खाली करावी लागेल!''

डॉ. मनमोहन सिंग सरकारवर, नेहमीच बाहेरच्या देशाकडून आपल्या देशावर जी आगळीक केली जाते त्याबाबत डॉ. मनमोहन सिंग हे नेहमीच त्या आक्रमक देशांचे लांगुलचालन करतात असा आरोप केला जातो. त्याचा प्रतिकार म्हणून रामलीला मैदानावर जो आंदोलकांवर रात्रीचा पोलिसी हल्ला केला गेला ते व्यंगचित्र पाहा. आपण संरक्षणाच्या दृष्टीने 'गबाळ' देश नाही हे चिदंबरम यांच्या उद्गारातून दाखवले आहे.

सुधीरजींनी गेल्या अनेक वर्षांत अनेक व्यंगचित्र प्रदर्शने भरवली आहेत व त्यांची ही प्रदर्शने देशातील दिग्गज राजकारण्यांनी अनुभवली आहेत स्वत: पाहून! पंतप्रधान डॉ. विश्वनाथ प्रताप सिंग हे हॉस्पिटलमधूनच सुधीरजींचे प्रदर्शन पाहायला आले. चक्क शेरवानी व फर कॅप घालूनच. (सुरुवातीच्या काळात ते फर कॅप व शेरवानीच वापरत असत. पण काही काळानंतर त्यांनी आपला 'ट्रेड मार्क' बदलला. झब्बा-कुर्ता वापरू लागले.)

त्यासंबंधी सुधीरजींनी त्यांना प्रश्न केल्यावर ते म्हणाले, ''अरे भाई, तुम्ही तुमच्या व्यंगचित्रामध्ये माझी ज्याप्रमाणे प्रतिमा निर्माण केली आहे त्याप्रमाणे मी दिसायला नको का?...''

दुसरे पंतप्रधान डॉ. नरसिंहराव. प्रदर्शन पाहायला आले होते. त्या प्रदर्शनामध्ये त्यांच्यावर अतिशय टीकात्मक व्यंगचित्रे प्रदर्शित केली गेली होती. तरीही त्यांच्या खिलाडूवृत्तीने त्यांनी आस्वाद घेऊन अभिप्रायाच्या पुस्तकामध्ये जे मत व्यक्त केले त्यांनी सुधीरजी भारावून गेले.

तिसरे पंतप्रधान देवगौडा. त्यांना




'स्लिपिंग ब्युटी' म्हणतात. २००२ साली तेही प्रदर्शन पाहायला आले. जरी त्यांच्यावर टीकात्मक असंख्य व्यंगचित्रे असली तरीही त्यांचा त्यांनी तिरस्कार केला नाही. आनंद घेऊन वर शाबासकीही दिली.

जसवंतसिंग संरक्षणमंत्री असताना तालिबानच्या प्रश्नावर जे व्यंगचित्र काढले ते सकाळीच जसवंत सिंग यांनी पाहिले आणि सुधीरजींना फोन करून विनंती केली, ''त्या व्यंगचित्राची मूळ प्रतिमा आपल्याला पाहिजे. घरामध्ये फ्रेम करून लावायला. तालिबानी दहशतवाद्याच्या वेशात आपण फारच छान दिसतो.'' असा त्यांनी सुधीरजींना अभिप्राय दिला.

त्याकाळी सुधीरजींना दोन व्यक्ती कॅरिकेचरसाठी 'रोल मॉडेल' वाटायच्या. एक– पी.व्ही. नरसिंहराव – त्यांचे दोन्ही गाल असे वाटतात की ते अंजलिना जोलीचाही 'पराभव' करतात. दुसरे म्हणजे लालकृष्ण अडवाणीजी. त्यांच्या जाडजूड भुवया, टूथब्रशसारखी मिशी आणि टक्कल हे चितारताना जणू काही आपल्यापुढे पंचपक्वान्नांचे जेवण पुढ्यात ठेवले आहे असे त्यांना वाटते.

पंतप्रधान राजीव गांधींचे कॅरिकेचर चितारताना खूपच त्रास झाला असे ते म्हणतात. कारण हँडसम व्यक्तिमत्त्व. पण ज्यावेळी त्यांचे केस कमी व्हायला लागले, पोट सुटायला लागले. त्याचवेळी 'बोफर्स'मुळे वस्त्रे उतरू लागली आणि अगदी सहजपणे त्यांचे कॅरिकेचर हातून निर्माण होऊ लागले असे सुधीरजी म्हणतात.

कॅरिकेचरचे कॅरिकेचर कसे काढणार हा प्रश्न त्यांना नेहमीच लालूप्रसाद यादव यांचे कॅरिकेचर करताना पडायचा. त्यांच्या घरी जाऊन लालूजींचे कॅरिकेचर काढण्याचा प्रसंग आला. लालूजी यांच्या सूचनेनुसार राबडीदेवींचे कॅरिकेचर काढले. लालूजी म्हणाले, ''और सब ठीक है पर राबडीदेवीजी का 'लीप' ठीक नही बनाया.'' त्यांनी स्वत: कॅरिकेचर काढण्यास सुरुवात केली व लगेच उद्गारले, ''हमसे नहीं होगा ये काम सुधीरजी.''

डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००४ ते २००९ या पंतप्रधानपदाच्या कारकिर्दीवर व्यंगचित्राच्या पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी विनंती केली व 'नो, प्रायमिनिस्टर' पुस्तकाची डमी त्यांच्याकडे पाठवण्यात आली. महिनाभराने पंतप्रधान कार्यालयाकडून निरोप आला, ''त्यांच्यावरच काढलेल्या व्यंगचित्रांमुळे पंतप्रधानांना 'ते' पुस्तक प्रकाशन करणे अडचणीचे व संकोचल्यासारखे वाटत आहे. सबब त्या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. सिंग करू शकत नाहीत.''

अशा प्रकारचे विविध अनुभव गाठीस बांधून सुधीरजींची घोडदौड चालू आहे. त्याच काळात त्यांनी अनेक मानसन्मान मिळवले.

२००४ साली राष्ट्रपतींच्या हस्ते 'पद्मश्री'ने त्यांना अलंकृत करण्यात आले. राजस्थानचा 'राजस्थान रत्न' पुरस्कार, तर मदर तेरेसांच्या हस्ते १९९४ साली 'सिटिझन ॲवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले. त्यांची व्यंगचित्रांची सात पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. टीव्हीसाठी अनेक मालिका तयार केल्या. काही छोट्याशा ॲनिमेटेड फिल्म्स बनवल्या. शिवाय कार्टून्सवर सीडी बनवल्या.

देशातील मान्यवर वर्तमानपत्रे – हिंदुस्थान टाइम्स, इंडियन एक्स्प्रेस, लोकमत, टाइम्समध्ये त्यांची व्यंगचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. सध्या त्यांची एशियन एज व डेक्कन क्रोनिकलमध्ये व्यंगचित्रे प्रसिद्ध होत आहेत.

त्यांच्या या सर्व धडपडीमध्ये त्यांची पत्नी विभा यांचे त्यांना पूर्ण सहकार्य व प्रोत्साहन मिळते. त्या स्वत: पत्रकार असून त्यांनी संडे ऑब्झर्व्हर, संडे मेल व BiTV साठी काम केले आहे. तर त्यांची लाडकी कन्या आदिती हिने BFA कमर्शिअल आर्टमध्ये केले असून सध्या ती स्वतंत्रपणे फॅशन फोटोग्राफी करत आहे. सुधीर तेलंग यांचा भाऊ राजेश अभिनेता असून एनएसडीमध्ये अभिनय केलेचे धडे विद्यार्थ्यांना देत आहे.

अशा हरहुन्नरी व्यंगचित्रकाराची इच्छा आहे, की पॅरिसच्या जगप्रसिद्ध 'लूव्हर' म्युझियममध्ये जशी पिकासो, मायकेलअँजेलो यांच्या दालनाशेजारीच जगामध्ये सर्वप्रथम कॅरिकेचरची ओळख ज्या 'केरास्सी' फ्रेंच बंधूंनी केली त्यांच्या कॅरिकेचरचे दालन आहे, त्याचप्रमाणे भारतामध्येही हुसेन, राजा रविवर्मा यांच्या दालनाच्या शेजारी आर.के. लक्ष्मण, शंकर, मारिओसहित आपल्याही व्यंगचित्रांच्या दालनाचे म्युझियम असावे.

**(सुधीर तेलंग** tailang.sudhir@gmail.com**)**

**– प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी–४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९
prabhakarwairkar@rediffmail.com

# चिनी आक्रमण

डॉ. अनंत पां. लाभसेटवार

मे २०१३ च्या एका भारतीय दैनिकाच्या महाजालीन आवृत्तीत मी चीननं लडाख भागात घुसखोरी करून मायभूमीचा पुन्हा लचका तोडला ही बातमी वाचली आणि मन ढवळून निघालं. डोक्यात क्रोधाग्नी पेटला. पूर्वानुभवावरून काही शिकलो नाही म्हणून आपल्या नाकर्तेपणाची, बेफिकीरीची व अकार्यक्षमतेची चीड आली. या आक्रमणाची पार्श्वभूमी महत्त्वाची होती. अवघ्या दोनएक आठवड्यांत चीनचे नवनिर्वाचित पंतप्रधान ली केक्यांग (Li Keqiang) प्रथमच भारताला भेट देऊन 'हिमालयावरून हस्तांदोलन' करणार होते. या घुसखोरीमुळे आपलं आतिथ्य नासेल याची त्यांना भीती नसावी. आपण लेचेपेचे असून शांतीचे व नीतिमत्तेचे पाठ उगाळण्यातच निपुण आहोत हे त्यांना चांगलं ठाऊक असावं. पन्नास वर्षांपूर्वी त्या देशानं लडाखचा एक लक्ष किलोमीटर क्षेत्रफळाचा भाग गिळंकृत केला तेव्हा आपला प्रतिसाद काय होता हे जगाला ठाऊक आहे. संयुक्त राष्ट्र संघात जाऊन बेंबीच्या देठापासून बोंबल्याशिवाय आपण दुसरं काय केलं? फुप्फुसांचा वायफळ वापर फक्त कमजोर देश करतात हे चीननं अचूकपणे हेरलं होतं. आपले परराष्ट्रमंत्री मेनन त्यावेळी तोंडाच्या वाफा सोडताना बेशुद्ध पडले याचा चीनवर व जगावर काडीमात्र परिणाम झाला नाही.

यावेळी त्या देशानं एकोणीस किलोमीटर आत घुसून आपला झेंडा रोवला. त्याला उत्तर द्यायला आपलं तटरक्षक दल कमी पडलं. आपला पहारा किती लेचापेचा आहे हे बघून चिनी सैन्याला नवल वाटलं असेल. कारण एकोणीस किलोमीटर आत घुसलं तरी त्यांना कुणी अडवलं नाही. प्रथम त्यांनी नवीन भागात एक-दोन तंबू बांधले. त्याला कुणी विरोध केला नाही म्हणून त्यांनी एकूण पाच तंबू ठोकले व ही 'नवीन ताबारेषा' म्हणून पाटी लावली. त्यांच्या सशस्त्र सैनिकांजवळ प्रशिक्षित कुत्री होती. उंच व विरळ वातावरणात विरोधकांवर हल्ला करण्यात हे प्राणी पटाईत. एवढंच कशाला, शत्रूनं हेलिकॉप्टर वापरून आमच्या भूभागाचं विहंगावलोकन केलं. तेव्हा कुठे आपल्या टाळक्यात आलं की ही घुसखोरी चुकून झाली नसून हेतूपूर्वक करण्यात आली आहे.

तक्रारींची देवाणघेवाण व निरसन करण्यासाठी चिनी आणि भारतीय सैनिकांच्या नियमितपणे भेटी होतात. या सभेत अपराध मान्य करण्याऐवजी चिनी अधिकाऱ्यांनी आपल्या प्रतिनिधींना धुडकावून दिलं व तिसरी सभा रद्द केली. याप्रमाणे चीननं प्रथम घुसखोरी करून आपल्याला लाथाडलं आणि मग मग्रुरी दाखवून थोबाडीत मारलं. त्यामुळे आपली चूक मानणं दूरच राहिलं. ही मवाली वृत्ती बघून दिल्लीतले सत्ताकर्ते सर्द झाले. संरक्षणाच्या बाबतीत सुस्त असणं आपल्याला काही नवीन नाही. यापूर्वी १९९९मध्ये पाकिस्ताननं कारगिलमध्ये तळ ठोकाला तरी आपल्या लक्षात कुठे आलं? युद्ध करून तो भाग काबीज करावा लागला. तरीही आपण याबाबतीत दक्ष का नाही याचं नवल वाटू लागतं.

या बाबतीत एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. चीन आपल्या सरहद्दीवर सैन्य (पीपल्स लिबरेशन आर्मी) वापरतो तर आपण तटरक्षक गस्तवाल्यांचा (इंडो-तिबेट बॉर्डर पोलिस) उपयोग करतो. ते आमच्या लष्कराचा भाग नसून गृहमंत्रालयाच्या नियंत्रणाखाली येतात. याचेच भाऊ नक्षलवाद्यांचा पाडाव करण्यासाठी वापरण्यात येतात. देशाच्या सरहद्दीच्या संरक्षणाची जबाबदारी लष्करेतर विभागावर सोपवणं सनदी अधिकाऱ्याला सत्यनारायणाची पूजा सांगण्यास सांगितल्यासारखं आहे. प्रत्येकाचे गुणधर्म वेगवेगळे असतात. हे बिहार, छत्तीसगड, गडचिरोली भागात राहणाऱ्या लोकांना चांगलं ठाऊक आहे. जून २०१३ मध्ये तर नक्षलवाद्यांनी कहरच केला. त्यांनी दिवसाढवळ्या बिहारमध्ये रेल्वे लुटली. देशांतर्गत शांतता ठेवण्यासाठी ही शक्ती असमर्थ आहे तर बलशाली चीनचं लष्कर रोखण्यासाठी ते सज्ज असतील यावर विश्वास ठेवण्यास बुद्धीला निलंबित करावं लागेल. याविषयी राष्ट्रीय चर्चा होणं आवश्यक आहे, पण आपली प्रसारमाध्यमं देशातला भ्रष्टाचार उकरण्यात मग्न व शाहरूख खानच्या खांद्यावर झालेल्या शस्त्रक्रियेमुळे सचिंत झाल्यामुळे ते या मुद्यावरच तारे तोडतात.

या सुरक्षा व्यवस्थेमागे कारण आहे. आपण स्वत:ला अहिंसेचे भक्त नव्हे तर जनक समजतो. सरहद्दीवर लष्कर ठेवल्यानं उगाच कलह निर्माण होऊन देश अनाहूत युद्धाच्या

खाईत लोटला जाईल याची आपल्याला भीती. पण चीनला तसं मुळीच वाटत नाही. ते राष्ट्र बेधडक सैन्य वापरून दुसऱ्या देशांना धमकी देतं. असा वर्चस्वगंड आपल्या रक्तात नाही. याबाबतीत आपण एवढे सभ्य, की सुरुवातीला चीननं आक्रमण न करता अजाण चूक केली असं उदात्त स्पष्टीकरण केलं. ताबारेषा संदिग्ध असल्यामुळे अशी चूक करणं कठीण नव्हतं. हे खरं असलं तर इतिहासात प्रथम आपण त्यांच्या प्रदेशात घुसखोरी करून 'अजाण चूक' कधी का केली नाही? आपल्या देशाचा तुकडा चीननं पादाक्रांत केल्यामुळे असं करण्याचा अधिकार आपल्याला नाही का? पण आपला पिंडच तसा नाही. याचा अर्थ असा की आपल्याला चीनची जेवढी भीती वाटते तेवढी चीनला आपली वाटत नाही. जे राष्ट्र आपलं अखंडत्व जपून ठेवण्यास असमर्थ आहे त्या देशाकडे जग आदरानं बघत नाही. असं करणं निव्वळ लष्करी बळावर अवलंबून नसून त्या देशाच्या निर्णयशक्तीवर आधारीत असतं.

तसं पाहिलं तर भारताची लष्करीशक्ती सांख्यिक दृष्ट्या तरी डोळ्यांत भरण्यासारखी आहे. आपलं सैन्य दहा लक्ष जवानांचं. ते जगात चौथ्या नंबरचं. ते सबळ करण्यासाठी हल्ली आपण पोटाला चिमटा लावून अब्जावधी डॉलरची लष्करी शस्त्रास्त्रं आयात करण्याचा सपाटा लावला आहे. सध्या जगात सर्वात जास्त शस्त्रं भारत विकत घेत आहे. आपण संरक्षणावर वाढता खर्च करत आहोत तर अमेरिका व युरोप त्याला कात्री लावत आहे. चीन लष्करावर दरवर्षी शंभरहून अधिक अब्ज डॉलर खर्च करतो. भारताला याबाबतीत चाळीस-पंचेचाळीस अब्ज डॉलरची फोडणी बसते. परंतु या विषमतेची भीती वाटण्याचं कारण नाही कारण चीनला रशिया, भारत, पाकिस्तान, व्हिएतनाम, लाओस, उत्तर कोरिया अशा अनेक देशांशी असलेल्या सरहद्दींचं रक्षण करावं लागतं तर आपल्याला फक्त दोनच देशांवर लक्ष ठेवावं लागतं- चीन व पाकिस्तान. याशिवाय चीनच्या मानेवर अमेरिकाप्रणित तैवानचं भूत लटकत आहे. त्यामुळे दोन्ही देश ढोबळपणे समतुल्य बळाचे आहेत असं समजण्यास हरकत नाही. म्हणून आपण लष्कर वापरून आपल्या न्याय्य सरहद्दीचं आक्रमक संरक्षण केलं तर चीनशी युद्ध उद्‌भवेल ही विचारसरणी चुकीची वाटते. तो देश लष्करी बळाकडेच लक्ष देतो. पण आमच्याजवळ ते असूनही त्याचा उपयोग केव्हा व कसा करावा त्यासाठी लागणारी मुत्सद्देगिरी नाही हे दुर्दैव! या बाबतीत आपण जपानकडून धडा शिकू शकतो.

चीनच्या तुलनेनं जपान कितीतरी लहान. त्याच्याजवळ फारसं लष्करही नाही. जे आहे ते आत्मसंरक्षणापुरतं. अणुबॉम्ब तयार करण्याचं आधुनिक ज्ञान असलं तरी त्या देशाची राज्यघटना व अमेरिकेचं दडपण त्याला अण्वस्त्र निर्माण करू देत नाही. दुसऱ्या महायुद्धात पराजय झाल्यावर जपानच्या विचाराला मुसक्या बांधण्यासाठी अमेरिकेनं त्या देशाला शस्त्रत्याग करण्यास भाग पाडलं. त्या बदल्यात महासत्तेनं जपानला संरक्षणछत्र दिलं. चीनसारख्या देशानं त्या राष्ट्रावर हल्ला केला तर अमेरिकेनं सुटकेसाठी धावून यावं असा करार आहे. परंतु अमेरिका सध्या अफगाण-इराक युद्धामुळे एवढी होरपळून गेली आहे की ती जपानच्या हाकेला 'ओ' देईल याविषयी जग शंकीत आहे. असं असूनही जपानची भित्री भागुबाई झाली नाही.

जपानच्या मुख्य बेटांपासून शेकडो मैल दक्षिणेला सेनक्राकू नावाची निर्जन बेटं आहेत. त्यावर आपले मालकी हक्क आहेत असं विस्तारगंडग्रस्त चीननं जाहीर केलं म्हणून जपाननं राक्षसी चीनसमोर आपली मान तुकवली नाही. लहान असूनही तो एखाद्या मर्दासारखा चीनसमोर उभा राहिला. जपाननं त्या बेटांच्या संरक्षणासाठी आपले सैन्यवजा पोलिस पाठवले. भोवतालच्या समुद्रावर नौदलाचा पहारा सुरू केला. चीननंही आपलं नौदल त्या दिशेनं रवाना केलं. दोन देशांच्या बोटींमध्ये चकमक होऊन जपाननं चीनच्या कप्तानाला पकडला, हे बघून त्या साम्यवादी देशानं आठ बोटींचा ताफा रवाना केला. म्हणून जपाननं माघार घेतली नाही. आपली लढाऊ विमानं पाठवून इशारा दिला. जपानच्या पंतप्रधानांनी आपण कुठल्याही हालातीत सेनक्राकू बेटांचं संरक्षण करू असं जगजाहीर केलं. हा आक्रमक पवित्रा बघून चीन थबकला व आपलं नौदल केवळ कवायतीसाठी पाठवलं असं लंगडं कारण सांगून त्यानं माघार घेतली.

भारताला अर्थातच युद्ध नको पण चीनला तरी कुठे हवं? सध्या दोन देशांत ७६ अब्ज डॉलरचा व्यापार होतो. तो आम्ही १०० अब्ज डॉलरवर नेऊ असं पंतप्रधान ली यांनी मोठ्या उत्साहानं दिल्लीच्या भेटीत जाहीर केलं. अशा व्यवहारातून भारतापेक्षा चीनला जास्त फायदा होतो. कारण तो संतुलित नसून एकतर्फी आहे. म्हणजे आपण जेवढा माल चीनला विकतो त्यापेक्षा कितीतरी जास्त तो देश भारताला पाठवतो. त्यामुळे दोन तोटे होतात. एक तर आपल्या परदेशी चलनाच्या गंगाजळीत त्रुटी निर्माण होते. दुसरं म्हणजे चिनी माल स्वस्त व तुलनेनं दर्जेदार असल्यामुळे भारतीय धंदेवाल्यांच्या पोटावर पाय पडतो. आजकाल गणपती, तोरणं, दिवे अशा वस्तू चीनमधून आयात केल्या जातात. आपले ग्राहक त्यांनाच देशी मालापेक्षा प्राधान्य देतात. त्यामुळे किती लोक बेकार झाले याची सरकारजवळ आकडेवारी देखील नाही.

हा असंतुलित व्यापार चीननं भारतातून जास्त माल आयात करून संतुलित करावा म्हणून आपण तक्रार नोंदवली तेव्हा चीननं उडावाउडवीची उत्तरं दिली. तुमच्याजवळ आम्हाला विकत घेण्यासारखं काही नाही असं तो म्हणतो. संगणकाची यंत्रणा (Software) व औषधासाठी लागणाऱ्या रसायनांची निर्मिती याविषयी आपला देश जगभर प्रसिद्ध आहे पण या निर्यातीवर चीननं स्वत:च्या धंद्यांवर पाय पडू नये म्हणून बंधनं घातलीत. भारत आता फक्त वसाहतीयोग्य गोष्टींचीच त्या देशाला निर्यात करतो. त्या म्हणजे कातडं व लोहयुक्त माती (iron ore).

आता यात म्हशीच्या मांसाची भर पडणार. चीननं भारताकडून दरवर्षी १.२ अब्ज डॉलरचं मांस विकत घेण्याचं कबूल केलं. हा व्यवहार पारतंत्र्यकाळात ब्रिटिश भारतातून कापूस नेऊन कापड आपल्याला विकत यापेक्षा फारसा निराळा वाटत नाही. असं असताना आपण त्या देशासमोर का नमतो हे एक कोडं आहे.

अहिंसावादी असणं स्तुत्य आहे पण देशाचं अखंडत्व धोक्यात आल्यावरही व शत्रूनं गालफाडात मारल्यावर दुसरा गाल पुढे करणं हे शुद्ध मूर्खपणाचं लक्षण नव्हे का? आमच्या नैतिक बळाला कुणी जुमानत नाही. खरं म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधात त्याला मुळीच स्थान नाही. जग लक्ष देतं ते ज्याच्या हाती मोठा बडगा आहे व ज्याला तो कसा वापरायचा हे ठाऊक आहे तिकडे. आपल्या संभ्रमामागे कारण आहे. भारतातल्या इतर संस्थांप्रमाणे परराष्ट्र मंत्रालयही किडलेलं आहे. त्यामुळे ते पंतप्रधानांना फारसा सल्ला देऊ शकत नाही हे एप्रिल २०१३च्या फॉरेन अफेअर्स (Foreign Affairs) या नामांकित मासिकाचा अंक वाचून चटकन कळतं. एका अनिवासी भारतीय महिलेनं दूतवासात, दिल्लीतल्या मंत्रालयात जाऊन बड्या बड्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन अनुमान काढलं की व्यूहात्मक विचार करणारे तिथे कुणी नाहीत. प्रत्येक अधिकारी पृथगात्म विचार करतो व स्वस्थ बसतो. त्यात समन्वय साधून मार्गदर्शन करणारा म्होरक्या मंत्रालयात नाही. भारताचं जागतिक स्थान व उद्दिष्टं याचं एकात्म आकलन कुणालाच नाही. खुद्द परराष्ट्रमंत्र्यांकडून अशी अपेक्षा करणं चुकीचं ठरेल कारण तो दोन घडीचा पाहुणा. त्याची बदली किंवा गळती केव्हा होईल याचा नेम नसतो. म्हणून ते काम मंत्रालयातील ज्येष्ठ भारतीय परराष्ट्र सेवाधिकाऱ्यांच्या (IFS) खांद्यावर पडतं.

या अधिकाऱ्यांनी मुलाखतीत जे विचार व्यक्त केले ते डोळे उघडण्यासारखे होते. त्यांनी म्हटलं की भारतानं जगात आपलं न्याय्य स्थान पटकावलं तर बरीच जबाबदारी पत्करावी लागेल. शेजाऱ्यांशी सौहार्दाचे संबंध ठेवावे लागतील. एवढंच नव्हे तर त्यांना प्रसंगी परदेशी मदत करावी लागेल व आपल्या प्रभावाच्या वर्तुळात आणावं लागेल. हे सर्व करण्यास आपले सेवाधिकारी उत्सुक नव्हते.

अशी शेळीवृत्ती अर्थातच चीनमध्ये सापडत नाही. त्या देशाला महासत्ताक राष्ट्राची झूल पांघरायची आहे. याविषयी त्यानं नि:संदिग्ध निर्वाळा दिला आहे. या उद्दिष्टाला पूरक अशी पावलं तो उचलतो. हिमालयावरील आक्रमण हा त्याचाच भाग आहे. द्रष्टेपणा नसलेले नेते जेव्हा गादीवर येतात तेव्हा त्याची परिणती नकारात्मक धोरणात होते. भारताची सेना दुर्बल नसून नेते नपुंसक आहेत असंच म्हणावं लागेल. कुठलंही ठोस पावलं उचलण्यास किंवा महत्त्वाचे निर्णय घेण्यास ते भितात. म्हणून स्थितप्रज्ञ राहतात. अशा पवित्र्यात निष्क्रियता नसून अभ्यासू (studied) कृती आहे असं उदात्तीकरणही ते करतात.

चिनी आक्रमणानंतर आपले संरक्षणमंत्री पंतप्रधानांना भेटण्यास गेले. तिथे त्यांनी आश्वासन दिलं की चिनी सैन्यानं माघार घेतल्यावर आम्ही तिथे भारतीय सेना पाठवून ८४ हजार कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधा बांधण्याचा वेग वाढवू. म्हणजे घोडा तबेल्यातून निघून गेल्यावर आपण दार बंद करणार. नोकरशाहीचं जडत्व आपल्या संरक्षण मंत्रालयातही सापडतं म्हणायचं. मग इतके दिवस काय आपण झोपलो होता का हा प्रश्न कुणी विचारत नाही. प्रामाणिक-पणाप्रमाणे उत्तरदायित्वाची भावनाही देशात सापडत नाही. मग बाहेरच्या घुशी देशात घुसल्या तर नवल कसलं?

आपण मंद गतीनं का होईना गेल्या चार-पाच वर्षांपासून चुमार (chumar) भागात लष्कारासाठी वाहतूक मार्गासारख्या पायाभूत सुविधा बांधत आहोत. हे बघून चीनला राग आला आणि म्हणून त्या देशानं घुसखोरी केली असं पांडित्य काहींनी उगाळलं. स्वत:च्या देशात संरक्षणार्थ पाऊल उचललं म्हणून शेजाऱ्याला राग येतो याला भीक घालायची असते का? म्हणजे आपली गुलामगिरी वृत्ती अजून लोप पावली नाही असंच म्हणावं लागेल.

काही वर्षांपूर्वी आपले पंतप्रधान अरुणाचल प्रांतात भेट देण्यास गेले असता चीननं आक्षेप घेतला. तसं करून भारतानं राजकीय वातावरण प्रक्षोभक केलं असा त्या पीतदेशानं आरोप केला. हा भूप्रदेश तिबेटचा दाक्षिणात्य विस्तार म्हणून तो आपल्या मालकीचा आहे असे तारे त्यानं तोडल्यामुळे तिथे भारतीय पंतप्रधानांना जाण्याचा अधिकार नाही असं त्यात अभिप्रेत होतं. एवढंच नव्हे, तर इथल्या लोकांनी चीनचा व्हिसा मागितला तर चीन नेहमीचा व्हिसा न देता निराळीच परवानगी देतो. म्हणून आपण अधिकृत तक्रार केली का? जर अमेरिकेच्या एखाद्या बड्या अधिकाऱ्यानं तैवानमध्ये पाय ठेवला तर चीन असाच भुंकतो.

खरं म्हणजे आपण अरुणाचल प्रदेशात रस्ते बांधले म्हणून चीनला तक्रार करण्याचं कारण नाही. कारण त्या देशानं रेल्वे व रस्ते आपल्या सरहद्दीला भिडून बांधले म्हणून आपण कुठे आक्षेप घेतले? या दुर्बल व पराजित मानसिकतेमुळे अतिरिक्त आक्रमण उद्भवतं असं म्हटलं तर ते औद्धत्याचं ठरू नये. सतत नमतं घेतल्यानं शत्रूचा आपल्याबद्दलचा आदर कमी होतो व त्याला जास्तीचं आक्रमण करण्यास प्रोत्साहन मिळतं, हा राज्यशास्त्रातला धडा आपण अजून शिकलो नाही.

त्यामुळे चीन शिरजोर झाला असं म्हटलं तर चूक होणार नाही.

**डॉ. अनंत लाभसेटवार**
2 Second Street, Unit # 2001,
Jersey City, New Jersey 07302,
USA
Tel. (01) 567 868 9432
latalabh@aol.com

# मी आयुष्याबद्दल समाधानी! – रामदास भटकळ

प्रसिद्ध प्रकाशक रामदास भटकळ यांनी 'आनंदी आनंद गडे' या बालकवींच्या चिर-स्मरणीय कवितेला नवी चाल लावून ती श्रोत्यांना म्हणून दाखवली. यामध्येच त्यांच्या जीवनाची सार्थकता आहे असा भाव घेऊन श्रोते आनंद मनात साठवत सभागृहाबाहेर पडले. वास्तवात भटकळ कृतार्थ मुलाखतमालेत बोलताना म्हणाले, की ''मी कृतार्थ जीवन जगलो किंवा नाही ते नाही सांगता येणार, पण मी माझ्या आयुष्याबद्दल समाधानी नक्कीच आहे.''

रंगत गेलेल्या 'कृतार्थ मुलाखतमाले'च्या (दुसऱ्या पर्वातील सातवी मुलाखत) कार्यक्रमात रामदास भटकळ यांच्या कर्तृत्वाचा पट उलगडला गेला. शुक्रवार, २३ ऑगस्ट रोजी सायंकाळी दादर माटुंगा कल्चरल सेंटरमध्ये रंगलेल्या या कार्यक्रमात एका मान्यवर प्रकाशकाची मुलाखत त्यांच्याच लेखकाने घेण्याचा सुंदर क्षण जुळून आला होता. मुलाखत घेतली प्रसिद्ध नाटककार-लेखक-दिग्दर्शक रत्नाकर मतकरी यांनी. त्यावेळी भटकळांनी त्यांच्या आयुष्याचा आणि प्रकाशन क्षेत्रातील प्रवास श्रोत्यांना मनमोकळेपणाने कथन केला.

व्हिजन महाराष्ट्र फाउंडेशन, ग्रंथाली आणि वैद्य साने ट्रस्ट यांच्या वतीने दर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात कृतार्थ जीवन जगलेल्या ज्येष्ठ व्यक्तीची मुलाखत घेण्यात येते.

आरंभीच रत्नाकर मतकरी यांनी, ते रामदास भटकळ यांच्याबरोबर एलफिन्स्टन महाविद्यालयात शिकत असल्याची आठवण जागवली. त्यावेळी मतकरी यांच्या वर्गात, भटकळ यांची पुढे पत्नी झालेल्या लैला पालेकर होत्या. त्यामुळे मतकरी यांनी 'रामदासचा डोळा आमच्या वर्गावर असायचा' असे सांगताच श्रोत्यांमध्ये हास्याची खसखस पिकली. मतकरी पुढे म्हणाले, की रामदास भटकळ यांच्याबरोबर त्यांचे नाते केवळ मित्रत्वाचे नसून लेखक-संपादकाचेही होते, तसेच त्यांचे बंध सामाजिक कार्यातूनही गहिरे होत गेल्याचे मतकरी यांनी सांगत त्या दोघांमधील जवळीक उलगडली, तेव्हाच त्या मुलाखतीचा रंग अनौपचारिक असल्याचे स्पष्ट झाले.

भटकळांनी बोलायला सुरुवात करताना म्हटले, की ''या कार्यक्रमाचे नाव कृतार्थ मुलाखतमाला असे असले तरी स्वतःला कृतार्थ म्हणवून घेण्यासाठी मनात तीव्र समाधान असण्याची गरज आहे आणि माझ्याकडून खूप काही गोष्टी करायच्या राहून गेल्या आहेत, ज्या केल्या त्यामध्ये चुकाही झालेल्या आहेत. त्यामुळे स्वतःला कृतार्थ म्हणवून घेण्यापेक्षा मला जे वाटतं ते मी माझ्या गाण्याच्या भाषेत सांगू इच्छितो.'' असे सांगून त्यांनी राग पूर्वकल्याण या बंदिशीमध्ये थोडा फरक करून काही ओळी गायल्या-

*धन धन भाग जागे आज मेरे*
*धन धन भाग जागे आज मेरे*
*सुगंभयो आभार तुमरे*
*धन धन भाग जागे आज मेरे*

भटकळ म्हणाले, की मी कृतार्थ म्हणवून घेण्यापेक्षा माझ्या हातून जे घडलं ते घडवण्यासाठी ज्यांनी ज्यांनी मला बळ दिलं त्या व्यक्तींबद्दल कृतज्ञ आहे. पण वयाच्या अठ्ठ्याहत्तराव्या वर्षीदेखील रागाचे चढउतार योग्य रीतीने पेलत गीत गाणारे रामदास भटकळ पाहून उपस्थितांना आश्चर्य वाटले. अनेकांना रामदास भटकळ गातात हे ठाऊक नसल्याने त्यांच्यासाठी तो सुखद धक्का होता.

मतकरी यांनी भटकळांना पहिलाच प्रश्न केला तो त्यांच्या समस्त कार्याचा पाया म्हणावा अशा त्यांच्यावरील संस्कारांचा वेध घेण्याचा दृष्टीने! त्यास उत्तर देताना भटकळ म्हणाले, की पारतंत्र्य असले तरी तेव्हा लोकांमध्येच उत्साह होता. आसपासची अनेक मंडळी विविध क्षेत्रांत मार्गदर्शन करत होती. आमच्या वाडीतच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सेवादल यांच्या शाखा होत्या, व्यायाम-शाळाही होती. त्यामुळे बौद्धिकांप्रमाणे व्यायाम, नाचगाणी अशा अनेक गोष्टींचे आमच्यावर संस्कार होत होते. त्या बारा वर्षांत स्वतःची मोठी जडणघडण झाल्याचे भटकळांनी सांगितले. त्यांनी त्यांच्या आयुष्यावर मोठा प्रभाव असलेल्या गांधींना प्रत्यक्ष पाहिले नसले तरी त्यांच्या आसपासच्या लोकांवर गांधीविचारांचा मोठा पगडा होता. त्यामुळे त्यांना बालपणी गांधीजी त्यांच्या सभोवताली असल्याचे जाणवे. त्या संस्कारांमुळे त्यांनी कॉलेजमध्ये प्रवेश केला तेव्हा मनाची स्थिती फार वेगळी होती असे भटकळ म्हणाले. सामाजिक संस्कारांबरोबर भटकळांवर त्यांचे वडील आणि भाऊ यांचा मोठा प्रभाव होता. ते सांगताना भटकळ म्हणाले, की ''मी केवळ माझ्याबद्दल बोलणे अर्थहीन आहे. कारण मी जो काही आहे तो त्यांच्या व सहकाऱ्यांच्या प्रभावातूनच घडलेलो आहे. मी जे कार्य केलं ते त्यांच्यामुळेच केलं आणि त्याची जाणीव मला आहे.''

त्यानंतर मतकरी म्हणाले, की



रामदासच्या ठायी असलेली उत्तम अभिरुची, कलेची आवड आणि योग्य-अयोग्याची चांगली समज हा त्याच्यावरील संस्कारांचा परिणाम असला तरी त्यात त्याची उपजत वृत्तीदेखील आहे. ही गोष्ट सुचवून मतकरींनी भटकळांना त्यांच्या प्रकाशन व्यवसायाबद्दल बोलते केले. भटकळ म्हणाले, की पॉप्युलरची सुरुवात १९२४ ची. त्यांचे वडील गणेश भटकळ केवळ वैद्यकीय पुस्तकांचे प्रकाशन करत असत. १९४८ साली पॉप्युलरचे गिरगावात बस्तान बसले आणि रामदास भटकळ कुतूहलाने मराठी साहित्याकडे वळले. त्यांनी वयाच्या सतराव्या वर्षी, १९५२ साली गंगाधर गाडगीळ यांचे 'कबुतरे' हे नवकथांचा संग्रह असलेले पहिले पुस्तक प्रकाशित करत स्वतःच्या कारकिर्दीला सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी वसंत कानेटकर, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर, ग्रेस, जी.ए. कुलकर्णी, ना.धों. महानोर, भालचंद्र नेमाडे, नारायण सुर्वे, कमल देसाई अशा अनेक मोठ्या व्यक्तींचे लेखन प्रसिद्ध केले. त्या प्रवासात त्यांचे कानेटकर, विश्राम बेडेकर यांसारख्या लेखकांशी विशेष बंध जुळले.

रामदास भटकळ यांच्या वडिलांचा त्यांच्यावर असलेला प्रभाव मुलाखतीत वेळोवेळी प्रकट होत राहिला. त्यांचे वडील प्रकाशन व्यवसायात असले तरीही त्यांनी स्पर्धात्मक वृत्ती ठेवली नाही. ''आमच्या शेजारी जर एखादे नवे दुकान उघडले तर वडील स्वतः त्याचे उद्घाटन करत आणि त्या दुकानाला सर्व प्रकारची मदत करत.'' असे सांगून भटकळ पुढे म्हणाले, की ''माझा मुख्य धंदा इंग्रजी प्रकाशनाचा असला तरी मराठी प्रकाशन ही माझी हौस आहे. मी अमकेतमके पुस्तक बाजारात चालेल का? त्यास वाचकांचा प्रतिसाद मिळेल का? असा विचार करून ते कधीच प्रसिद्ध केले नाही. मनाला वाटेल-पटेल तेच पुस्तक प्रसिद्ध केले. पुस्तके प्रसिद्ध केल्यानंतर ते खपवायचे कसे याचा विचार केला. जे चांगले आहे ते टिकेलच हा विश्वास होता. त्यामुळेच आम्ही प्रकाशित केलेल्या प्रत्येक शंभर पुस्तकांपैकी नव्वद पुस्तके आजही टिकून आहेत.''

रामदास भटकळ यांनी पॉप्युलरतर्फे प्रकाशित झालेल्या अनेक दर्जेदार पुस्तकांच्या आठवणींना उजाळा दिला. ते म्हणाले, की ''१९५०-६० चा काळ हा मराठी साहित्य-क्षेत्राच्या दृष्टीने मोठा प्रभावाचा होता. त्यावेळी विंदा करंदीकर, सई परांजपे, गाडगीळ यांच्यासारखी अनेक मंडळी लिहीत होती. त्या लेखनाचा स्तर खूप चांगला होता. आजचे लेखन मात्र तेवढे चांगल्या रीतीने केले जात नाही.'' भटकळ म्हणाले, की ''आम्ही प्रकाशित केलेल्या मराठीतील हजारभर पुस्तकांमध्ये नुसतेच चांगले लेखक आहेत असे नाही तर त्या सर्व पुस्तकांमधून आमची अशी संपादकीय दृष्टी जाणवेल. ते स्पष्ट करताना त्यांनी उदाहरण देत म्हटले, की ज्याप्रमाणे ऑर्केस्ट्रामध्ये विविध वादक असतात आणि प्रत्येकजण स्वतःचा वेगळा ताल वाजवत असतो, मात्र त्यातून निर्माण होणारी हार्मनी खूप छान असते. तसाच या सर्व पुस्तकांतून आम्ही एक विशिष्ट चित्र उभं करण्याचा प्रयत्न केला आहे आणि त्यामध्ये आम्ही बऱ्यापैकी यशस्वी झालो आहोत.''

त्यांनी जास्त का लिहिले नाही? या प्रश्नावर ते म्हणाले, की ''दुसऱ्या लेखकां-कडून लिहवून घेऊन त्यांना मखरात बसवताना आपण स्वतःदेखील मखरात बसू शकत होतो याचा विसर पडला!'' भटकळांच्या या वाक्यावर उपस्थितांनी दाद दिली.

कार्यक्रमात भटकळांच्या प्रकाशनां-बरोबर त्यांचे लेखन, त्यांनी केलेला गांधींचा अभ्यास, त्यांच्या आवडीची क्षेत्रे अशा अनेक मुद्यांबाबत गप्पा झाल्या. भटकळांनीही मोकळेपणाने त्यांचे अंतरंग व्यक्त केले.

कार्यक्रमाची सांगता रामदास भटकळांच्या सुरावटींनी झाली. सूरपेटीच्या साथीने भटकळांनी 'आनंदी आनंद गडे' या बालकवींच्या गीताला लावलेली नवी चाल पेश केली. त्या सुरांनी सारे सभागृह भारावून गेले होते. त्याचा नमुना थिंक महाराष्ट्र डॉट कॉमवर पाहता येईल.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला ग्रंथालीने प्रसिद्ध केलेल्या 'कथा इन्सुलिनच्या शोधाची' या डॉ. विजय आजगांवकर लिखित पुस्तकाचे रामदास भटकळ यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी बोलताना डॉक्टर आजगांवकर यांनी सांगितले, की मधुमेहावरील औषध म्हणून सर्वांना ठाऊक असलेले इन्सुलिन कसे निर्माण झाले आणि त्यामागचे नाट्य काय होते, ते सांगण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे.

विविधांगी रुची बाळगणाऱ्या आणि प्रकाशनक्षेत्रात मोठी कामगिरी करणाऱ्या रामदास भटकळांची ही विविधांगी मुलाखत पाहण्याची संधी तुम्हालाही मिळू शकेल. व्हिजन महाराष्ट्रकडून घेण्यात येणाऱ्या या मुलाखतींचे चित्रीकरण करून तो दस्तऐवज जपून ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. या आणि यापूर्वी झालेल्या सर्व मुलाखतींच्या डिव्हीडी मिळवण्यासाठी थिंक महाराष्ट्र डॉट कॉमकडे ०२२-२४१८३७१० या क्रमांकावर वा पुढील इमेलवर संपर्क करावा. इच्छुकांना या कार्यक्रमाच्या डिव्हीडी नाममात्र दरात उपलब्ध करून दिल्या जातील.

**- किरण क्षीरसागर**
thinkm2010@gmail.com

# एक सामाजिक परिसंवाद

## अशोक शाळिग्राम

अलीकडे 'ग्रंथाली'नं सामाजिक विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता. परिसंवादाचा विषय होता, 'जनसंवाद - प्रयत्न, अनुभव आणि निष्कर्ष'. गेली दहा-बारा वर्षं 'ग्रंथाली' व अनुषंगानं 'रुची' प्रस्तुत सामाजिक विषयाशी आणि पर्यायानं सु. गो. तपस्वी ह्यांच्या विचारांशी जोडली गेली आहे.

'रुची'मध्ये अनेक समाजवंतांच्या विचारांवर बेतलेली एक मुलाखतमाला काही वर्षांपूर्वी सादर झाली आणि 'विकासाच्या वाटा' ह्या सु. गो. तपस्वींच्या सामाजिक विषयावरील पहिल्या पुस्तकात ते लेख संग्रहित केले गेले होते. त्या विचारमालिकेतून तपस्वींना सामाजिक संशोधनाची स्फूर्ती मिळाली. रचनात्मक कार्यातून देशाचा उद्धार होऊ शकेल ह्या भावनेतून त्यांनी 'मातृमंदिर' ह्या सामाजिक संस्थेचा अभ्यास केला. त्या संशोधनाचं फलित म्हणजे 'विकासाची आशा' हे तपस्वींचं दुसरं पुस्तक. त्या पुस्तकाद्वारे देशातील समाजसुधाराच्या जबाबदारीबाबत एका दोलायमान मन-स्थितीच्या अवस्थेत तपस्वी पोचले. एवढे, की त्यांना स्वस्थ बसवेना आणि देशातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचा, त्या संबंधातील विवंचनांचा वेध घेऊन संशोधन करताना 'काळाची गरज' हा लेख त्यांनी लिहिला आणि नंतर महाराष्ट्रातील सत्तर-ऐंशी व्यक्तींकडे तो विचार होण्यासाठी रवाना केला.

'काळाची गरज' ह्या लेखात व्यक्त झालेल्या विचारांवर चर्चा करण्याकरता व त्या विचारांच्या प्रचाराकरता महाराष्ट्राच्या तालुक्यातालुक्यात तपस्वी फिरले. महाराष्ट्राचा तो दौरा त्यांनी पाचेक महिन्यांत पूर्ण केला व जनमत अजमावलं. दौऱ्यांतील चर्चांच्या अनुभवातून महाराष्ट्रातील सत्शक्तीचा एक मेळावा घ्यावा व त्या सभेत कामाची दिशा ठरवावी ह्या विचारातून सामाजिक विकास ह्या विषयावरील त्यांचं 'ट्रिलॉजी'तील शेवटचं पुस्तक 'विकासाची रूपरेषा' प्रकाशित झालं.

'ग्रंथाली'नं त्यानिमित्त दोन दिवसांचा मेळावा पुण्यात घडवून आणला होता. ते साल होतं २००९ आणि त्याच सत्शक्तीच्या मेळाव्यात 'जनसंवाद' ह्या व्यासपीठाची सुरुवात झाली. 'जनसंवाद'चा अध्यक्ष व समन्वयक ह्या भूमिकेतून केलेलं संशोधन त्यांच्या 'विकासाचे निष्कर्ष' ह्या पुस्तकात सादर होत आहे.

'विकासाचे निष्कर्ष' हे पुस्तक तयार झाल्यावर प्रकाशनापूर्वी त्या पुस्तकाच्या शंभरेक प्रती महाराष्ट्रातील संबंधितांकडे परिसंवादाच्या निमंत्रणाबरोबर पाठवण्यात आल्या आणि 'ग्रंथाली'नं 'जनसंवाद'च्या प्रस्तावावर, पुस्तकात व्यक्त झालेल्या विचारांवर व तपस्वींनी त्या अनुभवांतून काढलेल्या निष्कर्षांवर एक परिसंवाद घडवून आणला. तो परिसंवाद फक्त निमंत्रितांकरताच होता. दिवस सोयीचा असल्यास महाराष्ट्रातील गावोगावच्या निमंत्रितांतील परिसंवादात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींची नावं पुढे दिली आहेत. इतर अनेकांनी कळवलं होतं की एक श्रोता म्हणून ते परिसंवादास उपस्थित राहतील.

पुस्तकाच्या प्रस्तावनेसाठी मेधा पाटकरांना विनंती केली होती व त्यांनी पाठवलेला 'विकासाचे निष्कर्ष पुस्तकाविषयी व त्यानिमित्ताने' हा लेख परिसंवादापूर्वीच लाभला. मात्र, परिसंवादास त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत. पुढे निर्देश केलेल्या व्यक्तींपैकी अनेक जण परिसंवादात सहभागी झाले. परगावहून आलेल्या व्यक्ती धरून उपस्थितांची संख्या तीसच्या आसपास होती. हा परिसंवाद १९ मे, २०१३ रोजी 'आयएमडीआर', पुणे येथे साकार झाला.

परिसंवादाचं प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राज्यश्री क्षीरसागरांनी केलं तर समारोप आणि आभार प्रदर्शन आशुतोष भुपटकरांनी साधलं. परिसंवादादरम्यान व्यक्त झालेले विचार संक्षिप्तपणे ह्या लेखात उद्धृत केले आहेत.

'विकासाचे निष्कर्ष' ह्या तपस्वींच्या पुस्तकात मेधा पाटकरांचा लेख प्रस्तावनेच्या स्वरूपात समाविष्ट केला जाईल, तद्वत, 'परिसंवाद परामर्श' ह्या परिशिष्टात सदर परिसंवादाच्या संदर्भातील मजकूर व प्रकट झालेल्या विचारांचा भुपटकरांनी केलेला सारांश आणि तपस्वींचा उपसंहार समाविष्ट केला जाणार आहे.

'जनसंवाद'चा प्रस्ताव होता 'समाजशिक्षणाचा अभ्यासक्रम शालेय-शिक्षणात बारावीपर्यंत औपचारिकरीत्या अनिवार्य करण्याचा व बारावीत त्या विषयात प्राप्त झालेल्या गुणांना अभियांत्रिकी, वैद्यकीय वगैरे व्यावसायिक शिक्षणाच्या संस्थांमध्ये प्रवेशासाठी महत्त्व देण्याचा.' अशा प्रस्तावास शासन व समाजातील अनेक घटक विरोध करतील हे 'जनसंवाद'नं गृहीत धरलं होतं आणि त्या विरोधाची धार समाजातील प्रचार-

प्रसारातून बोथट करून न्यायालयाद्वारे शासनावर दबाव आणण्याचा त्या व्यासपीठाचा मानस होता. शालेयशिक्षणातून सुयोग्य व अर्वाचीन मूल्याधिष्ठित आणि राज्यघटनेला अभिप्रेत असलेली उद्याची पिढी घडवता येईल, अशा विश्वासातूनच अपेक्षित असलेल्या विरोधावर मात करण्यासाठी भारतीय संविधानानुसार जनतेला लाभलेला अधिकार वापरून सर्वोच्च न्यायालयातील यशस्वी जनहितयाचिकेद्वारे शासनाला सुयोग्य आदेश देण्याचा 'जनसंवाद'चा प्रयत्न होता.

शासनाला योग्य तो आदेश देण्याच्या प्रयत्नांतील जनहितयाचिका हा महत्त्वाचा भाग होता. प्रस्तुत जनहितयाचिकेच्या कामाला सुरुवात करून गरजेच्या संसाधनांची जुळवाजुळव करत असताना एक दूरगामी आराखडा 'जनसंवाद'साठी तपस्वींनी तयार केला व त्याच आराखड्यानुसार 'जनसंवाद'चे प्रयत्न दोन वर्षे होत राहिले. व्यवस्थापन-शास्त्रानुसार बनवलेल्या त्या आराखड्या-नुसार अपेक्षित सदस्यवृद्धी न साधल्यामुळे एका त्रैमासिक बैठकीत 'जनसंवाद' हे व्यासपीठ बरखास्त करण्यात आलं.

गेल्या दहा-बारा वर्षांत झालेलं सामाजिक संशोधन तपस्वींनी जवळून अनुभवलं होतं व त्याच अनुभवांचा ऊहापोह त्यांनी 'विकासाचे निष्कर्ष' ह्या पुस्तकात मांडला आहे. पुस्तकात व्यक्त झालेल्या तपस्वींच्या विचारप्रणालीवर व काढलेल्या निष्कर्षांवर चर्चा, हेच 'ग्रंथाली'नं आयोजित केलेल्या सदर परिसंवादाचं उद्दिष्ट होतं.

प्रास्ताविकात राज्यश्री क्षीरसागरांनी देशातील संविधान, तपस्वींची पार्श्वभूमी, 'जनसंवाद' सुरू होण्यामागची कारणमीमांसा व त्या स्वत: 'जनसंवाद'शी जोडल्या जाण्याची त्यांची कारणं विशद केली. 'व्यवस्थापनशास्त्रानुसार तयार केलेला उपक्रम एखादा समाजसुधार साधण्यासाठी उपयुक्त ठरून यशस्वी होऊ शकतो का?' ह्या प्रश्नाबाबतचं कुतूहल हे त्यामधील एक महत्त्वाचं कारणं होतं. त्या कुतूहलाची नोंद करून क्षीरसागरांनी परिसंवादाचं सूत्रसंचालन चांगल्या तऱ्हेनं साधलं.

पहिले वक्ते होते नागपूरहून आलेले रमेश खानझोडे. त्यांनी 'जनसंवाद'च्या उद्दिष्टाची उपयुक्तता व्यक्त करून वयस्क लोकांकडून दोन वर्षं पुढाकार घेतला गेला असला तरी 'जनसंवाद'चं कार्य तरुण कार्यकर्त्यांकडूनच पूर्ण होऊ शकतं, हा विचार मांडला. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या (अंनिस) डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी अंनिसच्या चळवळीच्या अनुभवातून 'जनसंवाद' उपक्रमाचं विश्लेषण केलं. 'जनसंवाद'चा उपक्रम जरी स्तुत्य असला तरी ते स्वप्नरंजन का ठरलं हे स्पष्ट केलं आणि त्या मार्गातील अडचणींचं विवेचन दाभोलकरांनी साधलं. नंतरचे वक्ते होते अभय पाटील. त्यांनी 'जनसंवाद'चे प्रयत्न अनैसर्गिक होते हे नोंदवून तो उपक्रम कणाविरहित भासला हे सांगितलं. 'मूल्यशिक्षण कसं असावं' हाच मूळ मुद्दा असावा, असं पाटील पुढे म्हणाले.

'जनसंवाद'च्या प्रस्तावाबाबत सहमती व्यक्त करताना मुस्लिम सत्यशोधक समाजाचे शमसुद्दीन तांबोळी ह्यांनी मुलांवर खरे संस्कार वयाच्या सहाव्या वर्षापर्यंतच होतात हे सांगितलं व त्या संस्कारांची वृद्धी प्रस्तावातून साधली जाईल हे अप्रत्यक्षपणे व्यक्त केलं. पुस्तकात समाविष्ट केलेलं तपस्वींचं 'विधानसभेतील भाषण' (काल्पनिक) हे प्रकरण आवडल्याचं सांगून तांबोळींनी शासकीय विचारसरणी बदलण्याची गरज व्यक्त केली आणि ते साधताना 'एखादा आदर्श हा वास्तवातूनच निर्माण करायचा असतो' हे स्पष्ट केलं. राजेंद्र माहुलकरांनी 'जनसंवाद'ची तुलना 'रोटरी क्लब' ह्या जागतिक उपक्रमाशी केली. रोटरी संपूर्ण कुटुंबाशी नातं जोडतं व तसं नातं 'जनसंवाद'नं निर्माण करून निराश न होता प्रयत्न चालू ठेवले पाहिजेत, असं ते म्हणाले. तज्ज्ञांचा सहभाग साधण्यासाठी अनेक सूचना माहुलकरांनी त्यांच्या भाषणादरम्यान केल्या.


**मेधा पाटकर यांच्या प्रस्तावनेसह प्रसिद्ध होत आहे...**




## विकासाचे निष्कर्ष

एका तपाच्या अनुभवातून

**सु.गो. तपस्वी**

**मूल्य ३५० रु. • सवलतीत २१० रु.**

भारतीय जनता अर्वाचीन जगण्याला लायक ठरण्यासाठी देशातील राजकीय व सामाजिक समस्यांवरील उपाययोजना घेऊन मी महाराष्ट्रभर गावोगावी फिरलो, विविध क्षेत्रांतील मान्यवरांशी व सामान्य माणसाशी संवाद साधला. प्रस्तुत लोकसंग्रहामुळेच मी २००९च्या मे महिन्यात मान्यवरांचा व तुमच्या-माझ्यासारख्या जनतेचा एक मेळावा पुण्यात आयोजत करू शकलो. त्या मेळाव्यातच 'जनसंवाद' ह्या व्यासपीठाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. 'जनसंवाद'चा अध्यक्ष व समन्वयक ह्या नात्याने दोन वर्षांत झालेल्या विचारांची सांगड सामाजिक संशोधनाशी घालून हयातभर गोळा केलेल्या अनुभवांवर बेतलेले हे मानवविकासाचे प्रयत्न, 'विकासाचे निष्कर्ष' ह्या पुस्तकात मी पुढील पिढीसाठी ग्रथित केले आहेत.

एका तपाच्या सामाजिक अनुभवातून काढलेले हे निष्कर्ष वादातीत आहेत असा माझा दावा नाही, पण पुढे जाण्यापूर्वी कोणीही ते दुर्लक्षित करू शकणार नाही!

**सु.गो. तपस्वी**

'जनसंवाद' संदर्भात तपस्वींच्या सामाजिक संशोधनाला कशी सुरुवात झाली हे सांगून तपस्वींच्या सामाजिक प्रवासाचे पैलू दिनकर गांगलांनी उपस्थितांसमोर मांडले. पहिल्या पुस्तकानंतर होणाऱ्या तपस्वींच्या लिखाणाच्या शैलीतील बदलांची दखल घेऊन ते म्हणाले, की 'विकासाचे निष्कर्ष' हे पुस्तक अत्यंत वाचनीय झालं आहे. सत्तरच्या दशकात सुरू झालेल्या 'ग्रंथाली' ह्या वाङ्मयीन चळवळीचे विश्वस्त व नेतृत्व आज त्यांनी तरुणाईकडे सुपूर्द केलं असून, तपस्वींनी 'ग्रंथाली'तील नवीन मंडळींशीसुद्धा जुळवून घेतल्याचं गांगलांनी नमूद केलं. परभणी येथील प्राध्यापक शिवाजी दळणर हे पुढील वक्ते होते. दळणरांनी स्वत:च्या अनुभवातून 'जनसंवाद'बद्दलच्या अपेक्षा व्यक्त केल्या व नाउमेद होऊ नये असा सल्ला दिला.

व्यंकटेश सांब्राणी ह्यांनी देशाच्या सामाजिक विवंचनेचं तपस्वींनी केलेलं निदान अचूक होतं हे सांगून समुदायाच्या मानसिकतेच्या अभ्यासातून व अनुभवातून पुढे जाण्याची गरज आहे, हे मत व्यक्त केलं. चंद्रकांत खरे हे मुंबईतील मुलुंडच्या ज्येष्ठ नागरिक संघाचे माजी अध्यक्ष आहेत व ते नंतरचे वक्ते होते. त्यांनी पुस्तकाबद्दल अभिप्राय व्यक्त करताना सांगितलं की 'विकासाचे निष्कर्ष' हे पुस्तक निव्वळ वाचनीय नसून मननीयसुद्धा आहे. राजकारणावर दबाव आणण्यासाठी ज्येष्ठ नागरिकांच्या वाढत्या संख्येचा विचार झाला पाहिजे हे त्यांनी आवर्जून सांगितलं. आयएमडीआरचे संचालक सुशील कांदळगावकर ह्यांनी संस्था, चळवळ व मूळ कल्पना ह्या गोष्टींचं महत्त्व थोडक्यात व्यक्त केलं.

व्यवस्थापनशास्त्रतज्ज्ञ आशुतोष भुपटकरांनी समारोपाचं भाषण केलं. उद्योगातील मालकीहक्क व व्यवस्थापनाची उतरंड ह्या गोष्टींची तुलना एखाद्या सामाजिक उपक्रमाबरोबर करून त्यांनी दोन क्षेत्रांतील फरक स्पष्ट केले. देशाची प्रगती व विकास साधताना सरंजामशाहीकडून भांडवलशाहीकडे होणाऱ्या जगाच्या वाटचालीत वर्गसंबंध व वर्गसंघर्ष अटळ असतो, हे भुपटकरांनी नमूद केलं. अमेरिकेत सर्वसामान्य नागरिकांची वर्तणूक कायदा पाळणारी असते ह्या गोष्टीचा विचार करताना तेथे लाभणाऱ्या सामाजिक सुरक्षिततेचा त्यांनी उल्लेख केला. सामाजिक सुरक्षिततेसाठी प्रशासनाकडून मिळणारं आर्थिक साहाय्य महत्त्वाचं ठरतं व एखाद्यानं सिग्नल तोडला तर त्या गोष्टीची नोंद होऊन त्या व्यक्तीला शासनाकडून लाभणाऱ्या आर्थिक साहाय्यावर अनिष्ट परिणाम होतो, हे स्पष्ट केलं.

परिसंवादाची समाप्ती करण्यापूर्वी 'ग्रंथाली' व 'आयएमडीआर'च्या विश्वस्तांचे, प्रेक्षक वा सहभागी म्हणून परिसंवादास उपस्थित राहिलेल्या व्यक्तींचे आणि तपस्वींचे आभार मानून भुपटकरांनी परिसंवाद संपल्याची घोषणा करून उपस्थितांना भोजनासाठी निमंत्रित केलं.

परिसंवादात व्यक्त केलं होतं त्याप्रमाणे तपस्वी स्वत: कणखर आहेत व यशापयशाची पर्वा न करता त्यांनी पुस्तकात स्वत:चे अनुभव परखडपणे व स्पष्टपणे मांडले आहेत.

परिसंवादात 'जनसंवाद'नं मांडलेल्या शैक्षणिक प्रस्तावाच्या विरोधात अशी चर्चा झाली नाही; ते तसं अपेक्षितच होतं. परिसंवादातील सर्वसाधारण सूर 'एखादी चळवळ अयशस्वी का ठरली, ह्या कारणमीमांसेचा' होता. 'जनसंवाद' बरखास्त करण्याचा निर्णय का घेतला गेला ह्या विषयावर मात्र परिसंवादात चर्चा झाली नाही.

'विकासाचे निष्कर्ष' ह्या पुस्तकातील विभाग ३ मध्ये योजनेच्या स्वरूपात तपस्वींनी 'जनसंवाद'च्या कामासाठी एक दूरगामी आराखडा तयार केला होता. दोन वर्षं प्रयत्न केल्यावर सुद्धा त्या आराखड्यानुसार अपेक्षित असलेली सदस्यसंख्या 'जनसंवाद'ला साधता आली नव्हती. उपक्रम देशव्यापी होण्याचं सोडा तो महाराष्ट्रातही रुजला नव्हता. एकही 'जनसंवादकट्टा' सुरू होऊ शकला नव्हता व इतर राज्यात समन्वयक शोधण्याचे तपस्वींचे प्रयत्न अयशस्वी ठरले होते आणि उपक्रम देशव्यापी होण्याची चिन्हंही नजरेस आली नव्हती. असं असताना, पुस्तकात सादर झालेल्या दूरगामी आराखड्यावर परिसंवादात चर्चा व्हायला हवी होती, ती मात्र झाली नाही.

दोन वर्षं राबवलेला 'जनसंवाद' हा सामाजिक उपक्रम शेवटी एक प्रयोगच ठरला. भुपटकरांनी परिसंवादात त्यांच्या समारोपात म्हटलं होतं तसं कोणत्याही प्रयोगाचं मूल्य उपक्रमाच्या यशापयशाच्या निष्पत्तीवरून न ठरवता आलेल्या अनुभवातून शिकण्यावरूनच ठरतं. त्यासाठी, ते अनुभव 'विकासाचे निष्कर्ष' ह्या आगामी पुस्तकात ग्रथित करून तपस्वींनी एक महत्त्वाची भूमिका बजावली आहे, हे मात्र निर्विवाद!

**परिसंवादात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती**

१. वसंत आपटे (सांगली), २. सुभाष आठले (कोल्हापूर), ३. गिरीश बापट (पुणे), ४. विद्या बाळ (पुणे), हरिश्चंद्र बोरकर (भंडारा), ६. आशुतोष भुपटकर (पुणे), ७. नरेंद्र दाभोलकर (पुणे), ८. सुभाष देशमुख (नाशिक), ९. मुकुंद धाराशिवकर (धुळे), १०. फादर दिब्रिटो (वसई), ११. कृ. ल. फाले (वर्धा), १२. दिनकर गांगल (मुंबई), १३. कुमार फुले (पुणे), १४. म. वि. जोगळेकर (मुंबई), १५. श्याम जोशी (चिपळूण), १६. रमेश खानझोडे (नागपूर), १७. अंजली कुलकर्णी (पुणे), १८. राज्यश्री क्षीरसागर (पुणे), १९. अनघा लवळेकर (पुणे), २०. राजेंद्र माहुलकर (पुणे), २१. राजेंद्र मुंबरकर (कणकवली), २२. जयंत नेने (पुणे), २३. शशिकांत नेने (पुणे), २४. रमेश परांजपे (पुणे), २५. सुरेशचंद्र पाध्ये (पुणे), २६. रमेश पतंगे (मुंबई), २७. अभय पाटील (पुणे), २८. विद्या पटवर्धन (पुणे), २९. नंदकुमार पुरोहित (पुणे), ३०. सु. वि. रानडे (सांगली), ३१. जुगलकिशोर राठी (अमरावती), ३२. सुनीलकुमार सरनाईक (कोल्हापूर), ३३. पीतांबर सरोदे (नंदुरबार), ३४. एम. बी. तौर (पुणे), ३५. सतीश राजमाचीकर (पुणे), ३६. देवकिसन सारडा (नाशिक), ३७. शमसुद्दीन तांबोळी (पुणे), ३८. भाई वैद्य (पुणे), ३९. सुभाष वारे (पुणे), ४० साधना झाडबुके (कोल्हापूर).

# वानुळा – अस्सल माणदेशी भाषेतला आविष्कार

**प्रा. नीलेश के. शेळके**

मराठी साहित्यविश्वात ‘ग्रंथाली’ प्रकाशनचे योगदान महत्त्वाचे आहे. अनेक नवोदित लेखकांच्या लेखनाला मराठी वाचकांसमोर पोहचविण्याचे काम ग्रंथालीने केले. याच ग्रंथालीने माणदेशातल्या प्रा. साहेबराव चवरे यांचा ‘वानुळा’ हा कथासंग्रह प्रकाशित करून आम्ही आजही नवोदितांना मराठी वाचकांसमोर आणतो हे दाखवून दिले. प्रा. साहेबराव चवरे हे माणदेशातल्या आटपाडी तालुक्यातले. माणदेश हा कायम दुष्काळी भाग म्हणून ओळखला जातो. दुष्काळात होरपळणाऱ्या माणसांच्या जगण्याची धडपड, त्यांचे दु:ख, रूढी-परंपरा, श्रद्धा-समजुती, समज-गैरसमज, अज्ञान, दारिद्र्य यातून घडत जाणारा त्यांचा मन:पिंड, संस्कृती या साऱ्यांना शब्दात अचूक पकडण्याचा प्रयत्न प्रा. चवरे यांनी केला आहे.

‘वानुळा’ या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत. ग्रामीण भागात शासकीय योजनांमुळे, निर्णयांमुळे काय होते, त्याचे साद-पडसाद कसे उमटतात हे ‘लगीन’, ‘आप्रीशनचा दणका’, ‘तरसवाडीच्या शाळेत NCERT ची पेटी’ या कथांमधून नर्मविनोदी शैलीत चित्रित केले आहे. मुलामुलींच्या लग्नाच्या वयाचा कायदा आला आणि ग्रामीण भागातल्या लोकांची काय अवस्था झाली याचे खुमासदार चित्रण ते करतात, तर आणीबाणीच्या काळात नसबंदी कायदा आला, त्यातून काय काय घडले याचे नाट्य उभे करतात. खेड्यातल्या शाळेत एखादी महत्त्वाची वस्तू दिली तरी तो जणू एक




**वानुळा**

**साहेबराव चवरे**

**मूल्य १०० रु.**

**सवलतीत ६० रु.**

खजिना आहे, त्याला कुणीही हात लावायचा नाही या भीतीने शिक्षकांचीच काय अवस्था होते याचे चित्रण ‘तरसवाडीच्या शाळेत NCERT ची पेटी’ या कथेतून येते. या सर्वच कथांत चवरे यांनी अचूकपणे नाट्य हेरले आहे हे लक्षात येते.

आपल्या कथेत सर्वसाधारण माणसांचे अनुभव ते व्यक्त करत असले तरी सहजतेने मनाची सूक्ष्म स्पंदने टिपण्याचे काम ते करतात. बाबू सुताराची ‘येश्वदी’ या कथेत तिची होणारी घालमेल, मनाचा सुटलेला बांध, सर्व रेषा ओलांडून; गावच्या भाषेत ताळतंत्र सोडून वागणारी, पण निवेदकापुढे स्वत:चे मन मोकळे करणारी ‘येश्वदी’ या कथेत आपल्याला भेटते. या साऱ्या निवेदनात लेखक कुठेही मनोविश्लेषणाचा पवित्रा घेत नाही तर सहजतेने एकेक धागा उलगडत जातो. पात्रांचे वर्तन आणि वर्तनाची सुसंगती, घटना आणि मनाची अंदोलने जाणिवेच्या पातळीवर रेखाटण्याचे काम करतो. त्यामुळे कथा कुठेही क्लिष्ट होत नाही. ‘तोडगा’, ‘माहेर’, ‘शीर सलामत तो’, ‘वायलं’, ‘गाडग्याची गोष्ट’ या साऱ्याच कथा अस्सल जीवनानुभव घेऊन येतात. ‘माहेर’ या कथेचे कथानक, घटनाक्रम, प्रसंग आणि कथा जिथे संपते या सर्व घटकांचा विचार केला तर कथेचे शीर्षक ‘माहेर’ऐवजी ‘मुराळी’ वगैरे असे काही असते तर अधिक बरे झाले असते. कथा शीर्षकातच चुकल्यासारखी वाटते. ‘गरिबीची व्यथा’ ही कथा घटनाप्रसंगांच्या बाबतीत नवीन काही देताना दिसत नाही. पूर्वी मराठी कथाविश्वात येऊन गेलेल्या विषयावरच फिरत राहते. एवढे काही किरकोळ दोष वगळता इतर कथा आपल्या वेगळेपणासह वाचकांना अंतर्मुख करतात. लेखक ग्रामीण परिसरात वाढलेला आणि आजही याच परिसरात जगणारा असल्यामुळे नेमके भान कथांमधून प्रकट करतो. अतिरंजितता, भडकपणा टाळून, पात्रांच्या स्वभावातला बेरकीपणा अचूक टिपतो. पात्रांचे मनोगत, त्यांचे वर्णन मोजक्या शब्दात करतो.

प्रादेशिक बोलीचा सशक्त वापर हे ग्रामीण साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण मानलेले आहे. वाक्प्रचार, म्हणींचा वापर यातून लोकव्यवहार कळतात. चवरे यांनी 'वानुळा'मध्ये ग्रामीण बोलीचे सगळे विशेष सशक्तपणे आणि अगदी सहजतेने वापरलेले आहेत. कथेतील संवाद खास शैलीत तर प्रकट होतातच, शिवाय लेखकाने संवादाचा वापर करताना संवादातून स्वभावाचे परिपूर्ण चित्रण केले आहे.

''ऊन मायंदाळ तिच्या आयला! फाट्यावनं हितंपतुर येवूस्तवर झेंडू फुटला.''

''तर काय! तुमच्याकडं पाण्याचं कसं?''

''पाण्याचं?'' पावण्यानं पुन्हा प्रश्न केला न् खिशातली पुडी काढून तंबाखू मळत म्हणाला,''आमच्या वाडीला टँकर चालू झालाय. रोज एकदोन टकुरी फुटत्याती नंबरावनं.'' (लगीन)

दुष्काळी भागात उष्णतेची दाहकता किती आहे आणि त्याचबरोबर पाण्याचा प्रश्न जीवनमरणाचा कसा आहे हे केवळ एकाच संवादातून दाखवून दिले आहे. संपूर्ण कथाभरच्या अनेक संवादातून शारीरिक हावभाव, व्यक्तीच्या बोलण्याची ढब, जात, वय, लिंग, मानसिक स्थिती यांचा प्रत्यय येतो. ''ती कुणाचं बेनं हाय रं? म्हारत्याचं दिसतंय जणू? येऽ पिळग्यानू हाना रं दांडरं वर इस्पारीकडं. मला आल्यातं शिकवायला गतकाळीचं!'' हे उद्‌गार एखाद्या पक्क्या बेरकी, पण वैतागलेल्या म्हाताऱ्या माणसाचे आहेत हे पटकन कळतं. *गट्टसोडच्या, बांबलपाडीच्या, टवळघोडीच्या, गतकाळीच्या, आभाळ हेप्पालल्यावानी* या अस्सल देशी शब्दांतून रागाच्या अनेक छटा दिसतात तर 'मतं तिवढी जास्ती पाहिजीती भाड्यास्नी,' 'खेडेगावात गाडीव सवासिन! डागदर हाय का डकलवार हाय कोण इचारतं डीग्रीला,' अशा वाक्यातून हा अस्सलपणा अधिक गडद होत जातो.

माणदेशी मातीतले अनेक शब्द संपूर्ण कथासंग्रहात येतात. 'जीत्तास पाण्याची हीर, हिडसूलं गाव, धगूरडंच्या धगूरडं, घालपाड्या माणूस, पानवीवर(रांजणावर), चिमखडा, सेवकळा, धबुडका, नाद्रुकी, ढेलजत, काडवाण, ठ्योंबठिळा असे शब्द; चुकतं रान चाळंलं हुतं, हापूस केलं, तारताळ्याा देणं, ढाळ्याा येगायच्या, सिताळा देणं, ऊन भलतंच तावंत हुतं, झिटालला, आवाकला, इरामला अशी काही खास शैलीतली क्रियापदे सापडतात. *दिस वरंगळीला लागला हुता आणि पेंडकसा दिस* अशी काळ सांगण्याची एक खास त्या परिसरातली शैली कथेत दिसते.

डेंगल्याल्या बैलागत, गुळावाणी उचाललं, दिसात पडलेली बाई, लाखाचं बारा हजार, मसुबागत बसला, काळजाला गिरमीट लागल्यावाणी, तोंडात राळं वाळलं हुतं, उभं वारं सुटलं होतं, झेंडू फुटला अशा उपमांचे कलम अनेक कथांमध्ये केलेले दिसते.

कवाच नव्हतं न् घुबडाच्या गळ्याात पवतं, साखरंचं खाणार त्याला देव देणार, चिखलाच्या टिरी कवाबी गळून पडायच्याच, गेली घाट अन् गुरवाचं का गेलं--, गावात म्हाळ न् कुतऱ्याची तारांबळ, बायकाचं ऐका अन् गाडगंभर पैका, दुपार-पातुर वाडी न् दुपारना झिपऱ्या झाडी, लाडानं येडा अन् गुळानं बोबडा, शेताआड चुरी न् कुकवाआड शिंदळकी, बायकांची अक्कल अन् कुंबडी मारती पायशिक्कल, आसंल ती इटवा अन् नसंल ती भेटवा अशा माणदेशी भाषेतील म्हणींनी कथेला सुंदर साज चढवला आहे. ध्वन्यानुकारी शब्दांची योजना हा आणखी एक भाषाविशेष इथे दिसतो. फाककिना लॅश मारला, पाकरं सुदीक झाडातनं कुचाचत हुती, फाकदून इज लवली, पाणी खाळ खाळ करत सुटलं होतं, पाण्याचं थेंब डबक्यातल्या पाण्यात बुद बुद करीत पडत होतं, ठिसफिस ठिसफिस, पावसानं बुरुबुरु लावल्यालं, ताटकिना उठून बसला, बक्कन दणका दिला अशी शब्दयोजना आलेली दिसते. अनेक कथांमध्ये इंग्रजी शब्दही खास ग्रामीण ढंगात अगदी सहजतेने वापरले आहेत. उदाहरणार्थ, डिगरी, डागदर, पायशिक्कल, मॉरन, इस्टेन, डायरेक, आप्रीशन, सर्तितिकटा इत्यादी.

व्यक्तीरेखाटनाची लेखकाची एक खास शैली आहे. व्यक्तीचे संपूर्ण वर्णन लेखक करत बसत नाही. भेकरागत चिकाट म्हातारी, डिगा जौंजाळा, घुमाडा नारू, कोचरा हरणा, ढांगूळा शेम्या अशा विशेषणातूनच एखादी व्यक्ती त्याच्या लकबींसह उभी केली आहे तर काही ठिकाणी अगदी मोजक्या वाक्यात व्यक्तिरेखाटन केले आहे. हरितात्या या व्यक्तीबद्दल लेखक म्हणतो, 'हरितात्या, लई घालपाड्या माणूस, वल्लं झाड उभं पेटवील. चालत्या गाडीला घुना घालील अन् रुतल्याली गाडी पळवत न्हील असा माणूस.' बाबू सुताराच्या बायकोचे वर्णन करताना 'गोरी गोरी पान बीगडीचं पान. मोरांगीवानी चाल' एवढे वर्णन पुरेसे होते.

लोकपरंपरेतील कथनशैली हा आणखी एक विशेष येथे सापडतो. पावणा आंब्या-खाली आला. 'दोघांनी एकमेकाला रामराम घातला. आधीच हातारलेल्या घोंगड्यावर पावणा बसला. केळीतला तांब्या भरून सीतारामनं पावण्याला दिला. चूळ भरून पावण्यानं तांब्याभर पाणी वडलं', या निवेदनासाठी लोकपरंपरेतली लय वापरली आहे. त्या खिडकीचा एक गज वाकल्यावानी झालता. न् जरा तुटाक दिसत हुता. मी असा बारकुळा. म्हणलं बघावं तरी. मुंडकं गजात घातलं. जरासं दाटलं पण गेलं बाहीर. म्हणलं जमलं. खंडुबाचं नाव घेतलं. ठोकली उडी. हा लोककथेचा बाज लेखक कोणताही आव न आणता सहज वापरून जातो. छोटी छोटी वाक्ये आणि त्यात विशिष्ट असा नाद, लय यामुळे एक वेगळीच कथनशैली निर्माण झाली आहे. या साऱ्या विशेषामुळे हा अस्सल माणदेशी 'वानुळा' मराठी वाचकांना निश्चितच रुचेल आणि या दशकातल्या ग्रामीण कथेत एक वेगळा ठसा उमटवेल याची खात्री वाटते.

**- प्रा. नीलेश के. शेळके**
डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर
nkshelake@gmail.com

ग्रंथाली

## डॉ. नरेंद्र जाधव यांचे प्रसिद्ध विचारसंचित

**मराठी ग्रंथविश्वातील अपूर्व घटना!**
**आमचा बाप आन् आम्ही नाबाद १,६०,००० प्रती**


**१६१ वी आवृत्ती!**




मूळ किंमत १२० रुपये सवलतीत ८० रुपये
टपालखर्च ३० रुपये


'लसावि–माझ्या समग्र अभिव्यक्तीचा' या ग्रंथामध्ये नरेंद्र जाधवांच्या विचारांची झेप, त्यांचे समृद्ध अनुभवविश्व–व्यक्तिगत, कौटुंबिक, सामाजिक आणि व्यावसायिक–त्यांचा लोकसंग्रह आणि त्यांचा झपाटा यांचा 'प्रोमो' वाचायला/पाहायला मिळतो.


– कुमार केतकर





जनआवृत्ती मूळ किंमत ४०० रुपये
सवलतीत ३०० रुपये
टपालखर्च ६० रुपये

**डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित व संपादित केलेल्या 'बोल महामानवाचे' आणि 'रवींद्रनाथ टागोर जीवनदर्शन या संग्राह्य ग्रंथत्रिवेणी**













'बोल महामानवाचे' – जनआवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

'रवींद्रनाथ टागोर' – डिलक्स आवृत्ती संच
मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रुपयांत
अधिक टपाल खर्च १०० रु.

RNI No. MAHMAR/2013/50137 Postal Registration No. MH/MR/WEST/310/2013-2015
Published on 10th of Every Month. Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th of Every Month.




बोस्टन येथे
बीएमएम अधिवेशनात
ग्रंथालीच्या पाच पुस्तकांचे
प्रकाशन झाले.
त्यावेळचे एक छायाचित्र

'हुंदके टाळण्यासाठी'
या पुस्तक प्रकाशनसमयी
निर्मला सामंत-प्रभावळकर,
स्नेहलता देशमुख,
न्यायमूर्ती बी.एन. श्रीकृष्ण,
लेखिका नीलिमा कानेटकर,
उषा तांबे, महेश कोठारे
आणि
श्रीकांत कानेटकर





'कालिदास : एका गुराख्याचे महाकाव्य' या पुस्तक प्रकाशनसममयी पद्मश्री जोशी, मधुसूदन जोशी, लेखक मयूर देवल, वर्षा तळवलकर, पल्लवी जोशी, देव, श्रीधर फडके, विजय कदम आणि विकास गोखले

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.